# प्रभाकर देवधर - व्यक्ती आणि कार्य

**अ. पां. देशपांडे** (लेखन काल २०१४)

२५ सप्टेंबर,१९३४ रोजी जन्मलेले श्री.प्रभाकर देवधर या सप्टेंबरात ऐंशीव्या वर्षात पदार्पण करीत आहेत, पण हे त्यांच्या चेहेऱ्यावरून अथवा शरीर प्रकृतीवरुन तर कोणाच्या लक्षात येणार नाहीच पण त्यांची चालही अजून एवढी वेगवान आहे की त्यांच्यापेक्षा २५ -३० वर्षाने लहान असलेल्या माणसाला सहजी त्यांच्याबरोबर चालणे जमणार नाही. या दणकट शरीर प्रकृतीचे रहस्य कशात आहे हे शोधायला गेले तर अजूनही सकाळच्या तासभरच्या व्यायामानंतर दिवसाच्या काठी आठ-दहा तास सृजनशील कामात ते व्यग्र असतात असे दिसून येते. लेखक काही लिहितो, तेही सृजनशीलच असते ना? पण देवधर दर आठवड्याला इंग्रजीत काहीबाही तर लिहितातच पण ते अजूनही इलेक्ट्रॉनिक्सच्या संशोधन कार्यात मग्न असतात. सध्या सौरऊर्जेची साधने बनवणाऱ्या `मित्रामॅक्स एनर्जी` या निवृत्तीनंतर सुरु केलेल्या सौरऊर्जा कंपनीचे ते संचालक आहेत. त्यामुळे या `साऊंड माइंड इन साऊंड बॉडी`ची जडण-घडण कशी झाली हे पहाणे मनोरंजक ठरेल.

## प्रभाकर देवधर - एक व्यक्ती

### घर-परिवार



डॉ. शंकर लक्ष्मण देवधर

प्रभाकर शंकर देवधर यांचा जन्म पुण्यातला. वडील डॉ. शंकर लक्ष्मण उर्फ तात्यासाहेब देवधर पुण्यातले नामवंत दंतवैद्य-डेंटिस्ट. त्यावेळी पुण्यात किनरे, देवधर अशी अगदी तुरळक डेंटिस्ट मंडळी होती. तात्यासाहेबांचा दवाखाना लक्ष्मी रोडला होता. सदाशिव पेठेतल्या चिमण्या गणपतीपाशी त्यांचे स्वतःचे मोठे घर होते, अंगणात बॅडमिंटन कोर्टही होते. त्यांची आई तिच्या मैत्रीणींसह तेथे रोज बॅडमिंटन खेळत असे. आईने महिला क्लब स्थापन केला होता व ४० - ५० बायका त्याच्या सभासद होत्या. तात्यासाहेब सुरुवातीला पुण्यात इलेक्ट्रीकल व मेकॅनिकल इंजिनिअरिंग शिकून मुंबईच्या परळमधील रेल्वे वर्कशॉप मध्ये नोकरी करत होते. पण त्यांच्या वडिलांनी त्यांना दंतवैद्यकी शिकून स्वतःचा दंतवैद्यकीचा व्यवसाय पुढे चालू ठेवावा असे सुचवले. वडलांचा हा सल्ला विचारात घेऊन ते कराचीला गेले. हा काळ १९२२-२३ चा होता. तेव्हा दंतवैद्यकीचे शिक्षण फक्त कराचीला मिळत असे. तेथे एक वर्षाचा दंतवैद्यकीचा कोर्स पुरा करून दंतवैद्यकीचे लायसेन्स घेतल्यावर पुण्यात येऊन त्यांनी आपल्या वडलांचा व्यवसाय पुढे चालू ठेवला. डेंटिस्ट हा डॉक्टर कम इंजिनिअर असावा लागतो. डेंटल कामात प्रेसिजन मेकॅनिकलला फार महत्व असते. इन्व्हेस्टमेंट कास्टिंगसारखे अत्यंत कुशलतेचे काम त्यात लागते. त्यामुळे हा डेंटिस्ट लवकरच खूप नावाजला. डॉ. देवधरांचा पिंड शास्त्रज्ञाचा.

त्यामुळे घर म्हणजे एक हॉबी वर्कशॉपच बनले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयीची पॉप्युलर सायन्स, पॉप्युलर मेकॅनिक्स, नॅशनल जिओग्राफिक अशी इंग्रजी मासिके घरी येत. डॉक्टर स्वतःच कवळय़ा बनवायचे. पॅराफिन वॅक्स आणि नॅचरल वॅक्सच्या मिश्रणातून वडील डेंटल वॅक्स बनवून युद्धाच्या काळात संरक्षण खात्याला पुरवायचे. त्यासाठी त्यांनी `नॅशनल डेंटल प्रॉडक्टस` नावाची कंपनी स्थापन केली होती. त्यांच्या व्यावसायिक ख्यातीमुळे महात्मा गांधी, गोळवलकर गुरुजी, वीर सावरकर अशा मातबर माणसांच्या पुण्यातील वास्तव्यात ते या सर्वांचे डेंटिस्ट होते. त्यांच्या अनास्थेशियात उपयोगी असणाऱ्या साधनाच्या संशोधानाबद्दल त्यांना वयाच्या सत्तरी नंतर मराठा चेम्बरचे पारखे पारितोषिक मिळाले होते.

अशा वातावरणात वाढल्यावर प्रभाकर देवधरांना साहजिकपणे इंजिनिअरिंगची आवड निर्माण झाली. घरी येणाऱ्या मोठय़ा लोकांचे सहचार्यही घडत गेले. इंजिनिअरिंगची ही आवड घरात केवळ प्रभाकर देवधरांमध्येच उतरली असे नसून त्यांचा थोरला भाऊ डॉ. नरहर शंकर देवधर यांच्यातही उतरली. वस्तुतः डॉ. न. शं. देवधर सार्वजनिक आरोग्य या विषयातील जगातील नावाजलेल्या तज्ञांपैकी एक, मध्यवर्ती सरकारमध्ये आरोग्य विभागाचे संचालकपद भूषवलेले, पण तरीही निवृत्तीनंतर पुण्यात औंधला बंगला बांधून स्थायिक झाल्यावर घरातले बरेचसे फर्निचर त्यांनी स्वतः बनवले. बागेतली सगळी कामे करण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची आयुधे वापरुन ते स्वतः अजुन वयाच्या ८५ व्या वर्षी बागकाम करतात. ओला आणि सुका पालापाचोळा यापासून खत बनवून केलेली त्यांची बाग फळाफुलांनी बहरलेली असते.



डॉ. बापू देवधर, प्रभाकर देवधर,
डॉ. नरहरपंत देवधर, अरुण देवधर(मागे उभे)

प्रभाकर देवधर यांना एकूण पाच भावंडे. डॉक्टर नरहरपंत उर्फ भाऊ, सर्वात थोरले. दुसरे बापू. ते पुणेनिवासी डेंटिस्ट होते. पण आता ते हयात नाहीत. त्यांची धाकटी बहीण मीना फडके. तीही आता हयात नाही. त्यानंतर श्रीकांत. तो सिव्हिल इंजिनिअर होता. तोही आता नाही व सर्वात धाकटा भाऊ अरूण. तो मुंबईतील नावाजलेला आर्किटेक्ट आहे. प्रभाकर देवधरांना दोन पुत्र आणि दोन कन्या.

**शालेय शिक्षण**

प्रभाकर शंकर देवधर हे १९४० च्या सुमारास पुण्यात प्रख्यात असणाऱ्या नूतन मराठी विद्यालयाचे (नूमवि) १९४४ ते १९५१ काळातील विद्यार्थी. त्यामुळे त्यांच्यावर नूमविमधील दबडघाव, वझे, तुळपुळे, करंदीकर, गोडबोले, पंत, नवाथे इत्यादी नामवंत शिक्षक मंडळींनी अनेक प्रकारचे संस्कार केले. या शिक्षक मंडळींनी अभ्यास करण्यासाठी दिलेल्या प्रोत्साहनामुळे त्यांनी

आपली ए डिव्हिजन कधी सोडली नाही. पण घरचे वातावरणही त्यांच्या खटपटी स्वभावाला खतपाणी घालत होते. आज रेफ्रिजरेटर उघडल्यावर आतली भांडी दिसण्यासाठी जसा दिवा पेटतो, तशी सोय देवधरांनी स्वतः १९४९ साली सर्किट बांधून आपल्या वह्या-पुस्तकांच्या कपाटाला केली होती. कपाटाचा दरवाजा उघडताच दिवा लागे व हवे ते पुस्तक बाहेर काढण्यासाठी दिसे. हे कपाटही त्यांनीच बनवले होते. त्यांचे त्यावेळचे शाळेतले एक सहाध्यायी श्री. म. बा. देवधर नुकतेच भेटले असताना म्हणाले, नाना (प्रभाकर) नेहमी ए डिव्हिजनमध्ये असे तर मी नेहमी डी डिव्हिजनवाला. पण तिमाही-सहामाही व वार्षिक परीक्षेला क्रमांक आद्याक्षरांनी लावत असल्याने माझी बैठक देवधर-देवधर आडनावामुळे, त्यांच्या मागच्या बाकावर येई. ऐन परीक्षेत मी त्यांना एखादे गणित अडल्यावर विचारी. एकदा ते सांगत, पण परत विचारल्यावर, तुला परत परत सांगणार नाही म्हणत. आता हे म.बा. देवधर मुलूंडला असतात व त्यांचाहि स्वतःचा रंग-रसायने बनवण्याचा उद्योग आहे.

**महाविद्यालयीन शिक्षण**



१९५१ साली प्रभाकर देवधर चांगले गुण मिळवून एस एस सी झाले आणि त्यांनी पुण्याच्या सुप्रसिध्द फर्ग्युसन कॉलेजात प्रवेश घेतला. पुढे इंजिनिअरिंग करायचे हे त्यांनी आधीच ठरवले असल्याने तेथून ते ए ग्रूप घेऊन इंटर सायन्स झाले. इंजिनिअर होणाऱ्याला ए ग्रूप घ्यावा लागे. त्यात भौतिकी, रसायन व गणित शिकवित. इंटर सायन्सच्या परीक्षेत वरचा नंबर मिळवून देवधरांनी पुण्याच्या प्रसिध्द कॉलेज ऑफ इंजिनिअरींग या सरकारी कॉलेजामध्ये प्रवेश मिळवला. पदवी देणारे देशातील हे दुसरे इंजिनिअरींग कॉलेज होते. कॉलेज ब्रिटिशांच्या काळात १८५४ साली स्थापन झाले, म्हणजे, १८५७ च्या स्वातंत्र्य समराच्याही तीन वर्षे अगोदर! प्रभाकर देवधरांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन या विषयात शिकायचे ठरवले; १९५३ सालचा हा अगदी आधुनिक विषय. त्यांचे प्राध्यापक होते सुप्रसिध्द चंद्रशेखर अय्या. अय्या मात्तबर शिक्षक होते. देवधर सांगतात की `पहिले दोन तीन दिवस प्रो. अय्या आम्ही निवडलेला विषय किती रोमांचकारी आहे, किती महत्वपूर्ण आहे हे सांगताना वर्गात एक रेडीओ लावत आणि मुंबईच्या स्टुडीओत गायलेले गाणे बिनतारी पध्दतीने पुण्याला येथे वर्गातील रेडीओत कसे पोहोचते असे विचारुन हेच तर सारे आपण आता शिकणार आहोत असे सांगून शिकवायला सुरुवात करीत. खरे शिक्षण कसे द्यावे याचा धडा आम्हाला त्यांनी दिला.`

**अँपलॅब लिमिटेड - सुरुवात**

१९५६ साली टेलिकम्युनिकेशनमध्ये बी.ई. केल्यावर देवधरांनी दिल्लीला आकाशवाणीमध्ये सहा महिन्याची अँप्रेंटिसशिप केली. पण देवधरांना ती नोकरी पसंत पडली नाही व त्यांनी दिल्ली सोडली आणि लगेचच ते मुंबईतील टीआयएफआरमध्ये न्यूक्लिअर इन्स्ट्रूमेंटेशन संशोधन आणि

उत्पादन विभागात मिळालेल्या नोकरीत रुजू झाले. ते सांगतात की त्यांचे खरे इंजिनियरिंगचे शिक्षण सुरु झाले ते मुंबईत टाटा इन्स्टिट्यूटमध्ये. हा विभाग होता कुलाब्याच्या जुन्या बरॅक्समध्ये. आज दिसणारी टीआयएफआरची इमारत तेव्हा झालेली नव्हती. ती त्यानंतर दहा वर्षांने म्हणजे १९६६ साली झाली. दोन वर्षानंतर नव्याने सुरु झालेल्या मेडीकल इलेक्ट्रॉनिक्स संशोधन विभागात अधिकाऱ्याची संधी त्यांना मिळाली. परळला टाटा कॅन्सर रिसर्च सेंटरमध्ये हा विभाग स्वायत्तपणे सुरु करण्याची तरुणपणात मिळालेली ही संधी देवधरांना भावली. अनेक मेडिकल इलेक्ट्रॉनिक उपकरणे त्यांनी या काळात निर्माण केली. मुंबईतील प्रसिद्ध ऱ्हद्रोग शल्यचिकीत्सक डॉ पी के सेन, डॉ. एन के दस्तूर, डॉ वाडिया, वेलोरचे




डॉक्टर गोपीनाथ वगैरे मंडळी ही उपकरणे वापरु लागली. १९६२ साली देवधरांना फोर्ड फौंडेशनची फेलोशिप मिळाली पण केवळ संशोधनामध्ये त्यांना रस नव्हता त्यामुळे ती नाकारून त्यांनी अँप्लाईड इलेक्ट्रॉनिक लॅबोरेटरी ही स्वत:ची संस्था १ ऑक्टोबर १९६२ साली सुरु केली. कंपनीचा ब्रँड होता `अँपलॅब`! कंपनी सातत्याने वाढत गेली. १९६४मध्ये संस्था प्रायव्हेट लिमिटेड होऊन कंपनीचे नाव ॲपलॅब प्रायव्हेट लिमिटेड झाले. कंपनीचे कामजाम बॉम्बे सेन्ट्रल समोरच्या शिवलाल मोतीलाल मॅन्शनमध्ये मोठ्या जागेत सुरु झाले. लवकरच झपाट्याने वाढणाऱ्या ॲपलॅबला जागा अपुरी पडली आणि १९६७मध्ये ॲपलॅबने ठाण्याच्या वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट मध्ये 'ॲपलॅब हाउस' ही स्वतःची मोठी इमारत बांधली. पुढील १० वर्षात भारतभरच नव्हे तर युरोपातही ॲपलॅबचे नाव पसरले. १९७३ साली इंग्लंडमध्ये 'ॲपलॅब युके लिमिटेड'ची सुरुवात झाली. १९९२मध्ये ॲपलॅबने अमेरिकेत प्रवेश केला. या काळात देशातील सारे इलेक्ट्रोनिक्स इंजिनिअर्स ॲपलॅबची उत्पादने वापरून शिकले.

गेल्या ५० वर्षात आपल्या देशात प्रथमच डिझाईन केलेली, उत्च दर्जाची आणि आयात होणाऱ्या परदेशी उत्पादनाच्या तोडीची अशी शंभराहून अधिक इलेक्ट्रोनिक्स उत्पादने ॲपलॅबच्या इंजिनिअर्स निर्माण केली. परदेशी निर्यात केली. आजही विज्ञान शिक्षणात लागणारी ४-५ कोटीची उत्पादने ॲपलॅब इंग्लंडला निर्यात करते. १९६६ पासून भारतीय सेना सातत्याने कोट्यावधी रुपयांची उत्पादने ॲपलॅबकडून खरेदी करते.

**प्रगतीशील अँपलॅब**

देवधरांची अँपलॅब कंपनी भरभराटीला कशी आली ते समजून घेणे महत्वाचे आहे.या कंपनीची वाढ ठरवून झाली नाही. देवधरांनी आपल्या इलेक्ट्रॉनिक्समधील भक्कम ज्ञानाच्या आधारावर आणि त्यांच्याच तालमीत तयार झालेल्या इंजिनिर्सच्या मदतीने अनेक उपकरणांची

कल्पक रचना केली आणि त्यांचा उत्तम दर्जा राखला. ही ॲपलॅबची आजही अतिशय महत्वाची ताकद. ज्ञानसंपादनासाठी देवधरांनी १९७० च्या दशकात जपानला आणि १९८० च्या दशकात जर्मनीला अनेकवार भेटी दिल्या. त्यातून त्यांनी तंत्रज्ञानातील परमोच्च म्हणजे काय हे अनुभवले. या भेटी त्यांना खूप शिकवून गेल्या आणि तसे काही आपण भारतात करावे अशी आव्हाने त्यांना खुणावू लागली. नवनवीन उपकरणांची रचना, त्याचे रूप आणि त्या उपकरणाची अचूकता व गुणवत्ता याचा फायदा ॲपलॅबला मिळत गेला.



ॲपलॅबचा ठाण्यातील ७०,००० चौ.फूट क्षेत्रफळाचा कारखाना

त्यामुळे पहिली काही वर्षे त्यांच्या कंपनीची वाढ दरवर्षी दुपटीने होत गेली. मुंबईतील  आयआयटी, पवई बीएआरसी, टीआयएफआर या संस्था आणि मुंबई बाहेरचे भारत इलेक्ट्रॉनिक्स, इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज, राष्ट्रीय एअरॉनॉटीकल लॅब असे देवधरांचे सातत्याने माल विकत घेणारे अनेक ग्राहक होते. ते सारे त्यांच्या उपकरणांचे चहाते होते. या संस्था वापरत असलेल्या परदेशी उपकरणांच्या जागी देवधर त्यांना भारतीय उपकरणे बनवून देत असत. १९६७ मध्ये भारत इलेक्ट्रोनिक्सचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल ए.सी.अय्यप्पा यांनी देवधरांना खास बोलावून घेतले व विचारले की, -४०° ते +५५° सेल्सियस तापमानाला संरक्षण दलाच्या चालत्या ट्रकमध्ये वापरता येऊ शकणारा एसी व्होल्टेज रेग्यूलेटर ते बनवू शकतील का? बरोबर आठ आठवड्यात देवधर त्या उपकरणाचा एक नमूना घेऊन अय्यप्पांकडे गेले. त्या उपकरणाची उभी-आडवी चाचणी झाली आणि ते उपकरण सेनादलाच्या नेमलेल्या साऱ्या चाचण्या पास झाले. बेलच्या मोठ्या ऑर्डरीनंतर भारतीय संरक्षण दलाकडून त्यांना काही दशके अशा उपकरणाच्या ऑर्डर्स येत होत्या. हा माल पुरवताना कधी कोणाला देवधरांनी लाच दिली नाही की एखादी भेट वस्तू. उलट हे ग्राहक लोकच त्यांना घरी जेवायला बोलवायचे. त्या अर्थाने देवधर हे गिऱ्हाईकांचे एक लाडावलेले पुरवठादार होते. येथे गंगा उलटी वाहत होती. ॲपलॅबला त्याकाळात भारतात तरी कोणी स्पर्धकच नव्हता. डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशनच्या सॅटलाईट अर्थ स्टेशनसाठी देवधरांनी पुरविलेली हाय पॉवर यूपीएस (अनइंटरप्टेड पॉवर सप्लाय) उपकरणे न बिघडता वर्षोन्वर्षे चालली. भारतीय नौदलाच्या साऱ्या फ्रीगेटवर ॲपलॅबनिर्मित ऑटोमॅटिक गंजप्रतिबंधक उपकरणे बसवलेली आहेत.

पहिली दहा वर्षे झाल्यावर आपण आता भारतीय बनावटीची इन्स्ट्रुमेंटस जर्मनीला निर्यात करु शकू असे देवधरांना वाटले. मग १९७२ साली  त्यांनी जर्मनीच्या हॅनोव्हर येथे भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात भाग घेतला. प्रदर्शनाला भेट देणारे लोक ह्या भारतीय माणसाकडे आश्चर्याने नजर टाकत पुढे जात. पण काही जर्मन व्यक्ती आकर्षित झाल्या. सुरवातीला पाठवलेले नमूने पाहून

जर्मन गिऱ्हाईक म्हणाले, “तुमचे उपकरण अपेक्षित कार्य करते पण आमच्याकडे हे उपकरण खपण्यासाठी काही मुलभूत बदल करून युरोपात आवश्यक चाचण्या केल्या पाहिजेत. २-३ महिन्यात त्या पूर्ण झाल्या. त्याच्या गिर्हाईकांपैकी पैकी एक, पीटर विझनेट्झ, तेव्हापासून गेले ४० वर्षे देवधरांचे आणि पुण्याचे इतके जवळचे मित्र झाले आहेत की आता त्यांचे जर्मनीतले घर हे देवधरांचे घर झाले आणि देवधरांचे मुंबईतले

घर हे त्यांचे घर झाले आहे. त्यांनी पुण्यातही एक उद्योग सुरु केला आहे.त्यांनी आणि देवधरांनी मिळून निर्माण केलेले काही प्रकल्प अपेक्षित यश बाजारात मिळवू शकले नाहीत पण त्यातून मिळालेल्या अनुभवाची किंमत पैशात करता येणार नाही इतके ते मोलाचे होते असे दोघांचेही मत आहे. तेव्हापासून जोडले गेलेले इतर दोन जर्मन ग्राहकही गेली चार दशके टिकून आहेत. यूरोपसाठी



प्रभाकर देवधर व पीटर विझनेट्झ

लागणारी उपकरणे अँपलॅब बनवून विकू शकल्याने कंपनीचा आत्मविश्वासही वाढत गेला आणि कंपनीच्या उत्पन्नाच्या दर्जाला गिऱ्हाईकांची दाद मिळू लागली.

हळूहळू अँपलॅबचा पसारा वाढू लागला. मग अँपलॅबमध्ये उपकरणांचे पाच विभाग निर्माण झाले. एसी-डी.सी.पॉवर सोर्सेस, टेस्ट अँड मेझरमेंट इक्विपमेंट, हाय पॉवर यूपीएस सिस्टिमस, बँकिंग ट्रँझक्शन ऑटोमेशन आणि रिटेल फ्युएल डिस्पेन्सर्स. यातून मिळणाऱ्या नफ्याचा मोठा हिस्सा आणखी नवीन उपकरणे विकसित करण्यात खर्च होत असे. नवीन उपकरणे विकसित करण्याची ही सगळी वर्षे म्हणजे देवधरांच्या आयुष्यातील सुवर्णकाळ.

सत्तेचाळीस वर्षे कंपनी चालवल्यावर देवधर १ ऑक्टोबर २००९ साली कंपनीच्या अध्यक्षपदावरुन निवृत्त झाले तोवर त्यांनी या कंपनीसाठी विविध प्रकारची ८००च्या वर नवीन उपकरणे भारतात विकसित करुन जगभर विकली होती. खरे म्हणजे ही सर्व उपकरणे बाजारात प्रचंड प्रमाणात विकली जाण्याची क्षमता त्यात खात्रीपूर्वक होती. त्यामुळे अँपलॅब हजार कोटीची होणे सहज शक्य होते. तो काही केवळ कल्पनाविलास नव्हता. अँपलॅबचे विक्री व्यवस्थापक एकापेक्षा एक वाघ होते, पण देवधरच त्यांच्या वाटेतील एक प्रचंड अडथळा होते. कारण कंपनीच्या उत्पादन खात्यात गुणवत्तेत तडजोड करायची नाही आणि विक्रीच्या वेळी कुठलीही ‘तडजोड’ करायची नाही हा देवधरांचा शिरस्ताच मुळी अडथळा ठरत होता.

खरे म्हणजे एखादा उद्योग खूप मोठा व्हावा अशी महत्वाकांक्षा ती सुरु करणाऱ्यामध्ये असायला हवी. मग त्यासाठी त्याने वेळ द्यायला हवा आणि तंत्रज्ञानापेक्षा धंद्याच्या वाढीवर, अधिक फायद्यावर नजर ठेवायला हवी. भारतात एखाद्याला आपला उद्योग वाढवायचा असेल तर फक्त आपली उत्पादने उत्तम असून भागत नाही तर सगळ्या प्रकारच्या तडजोडी करायची त्याची

तयारी हवी. त्याशिवाय एखाद्या उद्योगाचा आकार वाढवणे, त्याची बाजारपेठ तयार करणे, त्यासाठी लागणाऱ्या पैशाची जुळवाजुळव करणे व या सगळय़ासाठी पुरेसा वेळ देणे यासाठी लागणारी मनोवृत्ती श्री.देवधर यांच्यात नाही. तशा प्रकारचा उत्साह त्यांच्यात नाही हे ते स्वतःच सांगतात. त्या ऐवजी त्यांचा रस भारतात विकसित न झालेली नवीन उपकरणे निर्माण करण्यात आणि त्यासाठी लागणारे नवे तंत्रज्ञान निर्माण करण्यात आहे. म्हणजे हा माणूस व्यापारी वृत्तीचा नसून संशोधकी वृत्तीचा आहे. नवीन तंत्रज्ञान वापरून देशात प्रथमच नवे उपकरण निर्माण करण्यात त्यांचा अहंकार सुखावतो. ते स्वतः अचूक कारागिरीत आनंद मानणारे आहेत. तंत्रज्ञान हीच त्यांची आसक्ती (पॅशन) आहे व ते समजल्यावर त्यातून एखादी चांगली वस्तू बनवण्याकडे त्यांचे लक्ष असते.

**वैचारिक बैठक**

इलेक्ट्रॉनिक्स आणि इंजिनिअरिंग मटेरियल हे त्यांचे आवडीचे विषय. गोष्टी स्वतः हाताने करण्याचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळालेले. त्यांना खूप मोठी धनराशी जमवण्यात रस नाही.`गोल्ड रश` नावाच्या एका इंग्रजी चित्रपटात सोने वितळवण्याचा धंदा करणारा एक म्हातारा माणूस दाखवला असून द्रवरुप सोने ओतले जात असताना तो त्या रंगाकडे डोळे मोठे करुन पहात असताना म्हणतो, `आय लव्ह धिस कलर थ्रूआऊट माय लाईफ`. देवधरांचे तसे नाही. भारतीय तत्वज्ञान जगणारा हा माणूस. खायला-प्यायला पुरेसे मिळाले आणि बुद्धीला व कल्पकतेला सतत आव्हान असले की देवधर खूष. पैशासाठी आपले सर्वस्व ओतण्याचा जो स्वभाव भारतीय उद्योगपतींमध्ये दिसतो, त्यात देवधर मागास आहेत. त्यामुळेच ते कधीही कोणत्या चेंबर ऑफ कॉमर्स, सीआयआय, फिक्की यासारख्या संस्थात गेले नाहीत.

मात्र काही निवडक श्रीमंत लोकांबद्दल त्यांना अपरंपार आदर आहे, अशा घनिकांनी पैसा हे ध्येय मानले नव्हते तर त्यांना मिळालेला पैसा त्यांच्या दूरदृष्टी, विलक्षण कौशल्य, शहाणपण आणि नशीब याचे फळ आहे असे त्यांना वाटते. ही माणसे स्वत:ची श्रीमंती कधी मिरवत नाहीत. ते रहातातही फार साधेपणाने. त्यांच्या वागणुकीत सभोवतालचा गरिबीची जाण दिसते. पण सामाजिक जाणीवशून्य असलेल्या साऱ्या नवश्रीमंत लोकांकडे पाहून मात्र देवधरांना घृणा वाटते. अशा श्रीमंती मिरवणाऱ्या बहुतेक मंडळींचे पैसे अनेकदा वाम मार्गाने आलेले असतात. कायदा आणि प्रामाणिकपणाच्या कसोटीवर अशी माणसे तुरुंगात असायला हवीत पण हे धनदांडगे आज आपल्या समाजाचे आदर्श बनले आहेत. याचा देशातील अनेक सुज्ञ विचारवंतांना याचा फार खेद वाटत आहे.

केवळ अधिक पैसे मिळतात म्हणून एखादा धंदा देवधरांनी स्वीकारला नाही. कंपनीची वाढ करण्यासाठी, स्वनिर्मित भांडवल वाढवण्यासाठी आणि तंत्रज्ञान वाढीसाठी पुरेसा फायदा झाला की ते खूष असत. अशा स्वभावाचा माणूस आपली कंपनी हजार कोटींची कशी करणार? हे विधान देवधरांच्या स्वगतावर आधारित आहे. माझ्या पदरचे काही नाही.

इतर कंपन्या ज्या गोष्टी बनवू शकत नाहीत आणि ज्या वस्तू भारतीय लोकांना हव्यात अशी इलेक्ट्रॉनिक उत्पादने बनवण्यात देवधरांना असलेला रस आजही, वयाच्या ८० व्या वर्षी,

टिकून आहे. अशा वस्तुंची गुणवत्ता व त्याचे पॅकेजिंग पाश्चिमात्य देशांच्या तोडीचे देण्यात ते कधीही मागे पडले नाहीत.

## **ऑटोमॅटीक इलेक्ट्रिकचे समाधर्मा मधुकरराव भट**



श्री. मधुकरराव भट

अँपलॅबच्या सुरवातीलाच देवधरांना एका नावाजलेल्या इंजिनिअरचा सहवास लाभला. तो त्यांच्यासारखाच तंत्रज्ञानातील परमोच्चाकडे बघणारा होता आणि पैशासाठी हपापलेला नव्हता. ते म्हणजे मधुकरराव भट. वडाळय़ाच्या अँटोमॅटिक इलेक्ट्रीक लिमिटेडचे मालक. इंजिनिअरिंग हा त्यांचा श्वास होता. त्यांनी देवधरांना काही शिकवले नाही. पण एकलव्यासारखे देवधर त्यांच्याकडून बरेच काही शिकले. भटांनाही स्वतःच्या हाताने काम करायची हौस होती आणि इलेक्ट्रीकल पॅनल मीटर, व्हेरिएबल टोरॉयडल ट्रॅन्स्फॉर्मर, रेझिन कास्ट मीटरींग ट्रन्स्फॉर्मर अशी अनेक उपकरणे त्यांनी बनविली होती. ते स्वतः संशोधक तर होतेच पण हाडाचे इंजिनिअर होते. पुढे समानधर्मा भेटल्याने देवधरांनी भटांना स्वतःच्या धंद्यात भागीदार केले.

त्या दोघांनी मिळून स्टेपर मोटर्स आणि लाईन व्होल्टेज रेग्यूलेटर्स बनवले. या सर्व उत्पादनांना भारतातल्या विद्युत यंत्रे बनवणाऱ्या उद्योगांनी मोठमोठय़ा ऑर्डर्स देऊन त्यावर आपल्या पसंतीची मोहोर उठवली. त्यांनीच तर देवधरांना जपानची ओळख करुन दिली व नंतर ते जपानला एकत्रच जात. भट हे जरी देवधरांच्या अँपलॅबमध्ये भागीदार असले तरी ते कोणत्याही प्रकारे अँपलॅबमध्ये ढवळाढवळ करत नसत. देवधरांनी केलेल्या अँपलॅबच्या प्रगतीबद्दल भटांना नेहमीच कमालीचे कौतुक होते.

अँपलॅबने सातात्याने उद्योगधंद्यांना लागणारी उपकरणे बनवण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. लोकांच्या रोजच्या उपयोगाच्या वस्तू (कन्झुमर गुड्स) त्यांनी बनवल्या नाहीत. मात्र अशी दोनच उपकरणे देवधरांनी लोकांसाठी बनवली. त्यातले एक होते १४ इंची कृष्ण धवल टेलिव्हिजन. हे घडले देवधर भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक ट्रेड अँड टेक्नॉलॉजी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (इटी अँड टी) या संस्थेचे अध्यक्ष होते तेव्हा. सामान्य जनतेला १४०० रूपयात या संस्थेने १४ इंची कृष्ण धवल टेलिव्हिजन सेट बनवून दिला होता, तोही भारतातल्या ग्रामीण जनतेसाठी! ही गोष्ट १९८६ सालातली. त्यावेळी टेलिव्हिजनच्या एकूण बाजारपेठेत इटी-अँड-टी चा वाटा ४० टक्के होता! त्यानंतर त्यांनी आयबीएमबरोबर समाईकरित्या बनवलेला संगणक, “पीपल्स कॉम्पुटर”, १०,००० रुपयात देशाला दिला आणि संगणकाचे देशातील भाव निम्म्यावर आणले. इटी-अँड-टीने हजारो संगणक संच देऊन सामान्यांना परवडेल असे संगणक युग निर्माण करायला अधिक चालना दिली. पण दिल्लीच्या या वातावरणात देवधर फार काळ रमले नाहीत. देवधर १९९० मध्ये परत ठाण्याला

अँपलॅबमध्ये येऊन संशोधनाचे-उपकरणे विकसित करण्याचे काम करु लागले.

## सरकारी अदूरदर्शी उद्योगनीतीमुळे अँपलॅबच्या प्रगतीला फटका

जगभरातील अनुभव असा आहे की छोटय़ा आणि मध्यम आकाराचे उद्योगच नवनवीन संशोधन करून उत्पादनात आणि उत्पादन प्रक्रियेत भर घालत असतात. अमेरिका आणि इस्रायलमध्ये अशा लोकांना पायोनियर म्हणतात आणि सरकार माल आयात करण्याऐवजी यांच्याकडून तो खरेदी करते. आपल्या देशातील सरकारला मात्र तंत्रज्ञांचा व्यवस्थित उपयोग कसा करुन घ्यावा हे आजही समजत नाही. अँपलॅबने विकसित केलेल्या दोन वस्तूंच्या बाबतीत सरकारने असा आत्मघातकी अन्याय केला. याचा अँपलॅबच्या वाढीवर मोठ्ठा परिणाम झाला आणि देशाचेही मोठे नुकसान झाले.

स्मार्ट कार्डावर चालणारे सार्वजनिक फोन आणि एटीएम मशिन या दोन वस्तू भारतात मोठय़ा प्रमाणावर हव्या होत्या. टाटा समूहानेही एटीएम बनवायचा प्रयत्न केला होता, पण पुढे त्यांनी तो सोडून दिला. हय़ा दोन वस्तूंच्या मोठ्या ऑर्डरी सरकारकडून अँपलॅबला मिळायला हव्या होत्या पण ते झाले नाही. खरे म्हणजे अँपलॅब या दोनही बाबतीतले पायोनियर. पण त्या प्रतिष्ठेचा आर्थिक फायदा अँपलॅबला मिळाली नाही. देवधरही अशा गोष्टींसाठी हटून बसणारे नाहीत. नाही तर नाही, सोडून द्या म्हणणारयातले आहेत. स्मार्ट कार्डचलीत सार्वजनिक फोनच्या आणि एटीएमच्या ऑर्डरी अँपलॅबला न मिळायचे कारण डिपार्टमेंट ऑफ टेलिकम्युनिकेशन आणि राष्ट्रिकृत बँकांनी अँपलॅबला पहिल्या फेरीतच बाद केले, एक सोपी कूटनीती वापरून! अशा हजारो वस्तू बाजारात वापरात असणाऱ्या कंपन्यांनाच त्यांनी टेंडर भरण्यास परवानगी दिली आणि एका फटक्यात अँपलॅबला बाहेर फेकून दिले! एका मोठ्या खाजगी बँकेने एटीएमची अँपलॅबची निविदा मंजूर केली होती. पण त्याचा उपयोग करुन परदेशी एटीएमच्या किंमती कमी करण्यासाठी त्याचा वापर केला असे देवधरांना त्या बँकेच्या अध्यक्षांनीच सांगितले.

## स्मार्ट कार्डचलीत सार्वजनिक फोन

स्मार्ट कार्डाचे महत्व अँपलॅबने १९९० सालीच ओळखले होते. राजीव गांधी डिसेंबर,१९८९ मध्ये निवडणूक हरले होते. लगोलग आपल्या दिल्लीतील जागेचा राजीनामा देऊन देवधर ठाण्यास परत आले. सार्वजनिक टेलिफोन वापरायला स्मार्ट कार्डाचा उपयोग देवधरांनी पॅरिसमध्ये होताना पाहिला होता. चंदिगडमधील सेमी कंडक्टर कॉम्प्लेक्स लिमिटेड

कंपनीत इइप्रोम (इलेक्ट्रीकली इरॅजेबल प्रोग्रॅमेबल रिड ओन्ली मेमरी) तंत्रज्ञान वापरुन चिप बनवता येऊ शकतात हे देवधरांना माहीत होते. ही चिप वेगळय़ा पध्दतीचे डिझाईन करुन टेलिफोनसाठी वापरता येईल हे देवधरांना ठाऊक होते. अँपलॅबने या कंपनीला खूप मोठी किंमत देऊन अशा चिप्स बनवून घेतल्या. चिप वापरुन त्या टेलिफोनमध्ये वापरायचे तंत्रज्ञान त्यांनी विकसित केले व मुंबई टेलिफोनमध्ये सहा महिने त्याच्या चाचण्या घेतल्या. त्या यशस्वी ठरल्यावर टेलिफोन कंपनीने लोकसभेत व दिल्लीतील शेकडो ठिकाणचे टेलिफोन या तंत्रावर सुरु केले. यासाठी कोठेही लाच द्यावी लागली नाही.स्मार्ट कार्ड या विषयावर दिल्लीत भरलेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेने देवधरांचा `स्मार्ट कार्ड इंडस्ट्री पायोनियर` म्हणून



सन्मानही केला. अठरा महिने हे फोन दिल्लीत यशस्वीपणे चालल्यावर टेलिफोन कंपनीने १०,००० स्मार्टकार्ड फोन साठी निविदा मागवल्या. या बातमीमुळे अँपलॅबमध्ये एक चैतन्याची लाट निर्माण झाली, कारण हे तंत्रज्ञान भारतात केवळ अँपलॅबनेच विकसित केले होते व ते व्यवहारात आणून दाखवले होते. २०० कोटी रुपयांहून अधिकचा हा मोठा धंदा अँपलॅबला मिळण्यात काही अडचण नव्हती. पुढेही केवळ हाच धंदा हजारो कोटींचा होवू शकला असता.

देवधरांनी संबंधित मंत्र्यांना भेटावे म्हणून अँपलॅबच्या दिल्ली कार्यालयाने देवधरांना सुचवले. देवधर मंत्री सुखराम यांना भेटले. तोवर सुखरामना ही कंपनी देवधरांच्या मालकीची आहे हे ठाऊक नव्हते. त्यांनी देवधरांना सन्मानाची वागणूक दिली. देवधरांनी त्यांना स्मार्ट कार्ड कसे विकसित केले हे सर्व सांगितले. त्याच्या पुढच्या आठवडयात देवधरांना समजले की ही त्यांच्या यूरोपियन स्पर्धकाने एवढी मोठी ऑर्डर पुरी करायचा अँपलॅबला काय अनुभव आहे असा वाद निर्माण केला. टेलिफोन डिपार्टमेंटने अँपलॅबला ही ऑर्डर देऊन आपल्याला काहीच खाजगी फायदा मिळणार नाही हे दिल्लीत साऱ्यांना ठाऊक होते,त्याचाच हा परिणाम!

निविदा ज्यावेळी उघडल्या तेव्हा टेलिफोन डिपार्टमेंटने असे ५०,००० टेलिफोन बसवण्याचा अनुभव हवा अशी अट घातली. लेखणीच्या एका फटक्यात अँपलॅबला दिल्लीने यातून बाहेर फेकले. ज्या कंपनीने भारतात हे तंत्र प्रथम विकसित करुन यशस्वी करुन दाखवले, त्या कंपनीला भारत सरकारने दिलेले हे बक्षीस होते. पण देवधरांच्या दिल्लीतील मित्रांनी सरकारला हे फोन इतर कंपन्यांकडूनही विकत घेऊ दिले नाहीत. त्यानंतर लवकरच सेल फोन आले आणि हे स्मार्ट कार्ड वापरणारे सार्वजनिक फोन बासनात गुंडाळले गेले. गमतीची गोष्ट पुढेच घडली आणि अँपलॅबचे हे फोन यूरोपात बेल्जियममध्ये मंजूर झाले, पण त्या देशाला त्यासाठी भारत देशाने आंतरराष्ट्रीय हमी द्यायला हवी होती. हे कसे करायचे हे देवधरांना ठाऊक नसल्याने ही ऑर्डरही त्यांच्या हातातून निसटली.

**अँपलॅबचे एटीएम**




१९९५ मध्ये देवधरांनी भारतातील पहिला ए.टी.एम बनवला. यासाठी त्यांना ब्रिटनमधील डे-ला-रु कंपनीने अचूकपणे नोटा मोजून देणारे जगप्रसिद्ध मेकानिझम देऊन त्यांचा एटीएम विश्वासाने आणि खात्रीलायकपणे वापरण्यास योग्य बनवण्यास मदत केली. बाकीचे इलेक्ट्रोनिक हार्ड वेअर आणि सोफ्टवेअर बनवणे अँपलॅबला सहज शक्य होते. पहिल्या बारा महिन्यात अँपलॅबने शंभरच्यावर ए.टी.एम यंत्रे विकली. या यंत्राच्या रचनेत अँपलॅबची काही खास वैशिष्ट्ये होती. आयात होणाऱ्या एटीएममध्ये ही वैशिष्ट्ये आजही दिसत नाहीत! पैसे काढणाऱ्या व्यक्तीला स्वतःची भाषा वापरता येते तसेच पैसे काढणाऱ्या व्यक्तीचा फोटो आपोआप निघायची सोयही त्यात होती. एटीमचा दुरुपयोग करून फसवणाऱ्या व्यक्तींना ओळखायला यामुळे मदत होते. पण भारतातल्या राष्ट्रीकृत बँकांना याची कदर नव्हती. अँपलॅबच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धकांनी अँपलॅबला बाहेर काढण्याची एक सोपी युक्ती बँकांना सुचवली. किमान ५००० यंत्रे विकण्याचा पूर्वानुभव असणाऱ्यांनाच अशा ऑर्डरी मिळाव्यात अशी अट आपल्या बँकांनी निविदा भरणाऱ्यांना घातली! साहजिकच कोट्यावधी रुपयांचा हा खात्रीचा अपेक्षित धंदा अँपलॅबला मिळू शकला नाही. एका भारतीय कंपनीला अशा पायोनिअरिंग कामासाठी सरकारने प्रोत्साहन द्यावे आणि वीस टक्केतरी भारतीय बनावटीचा माल घ्यावा म्हणून देवधर दोन मंत्र्याना दिल्लीत भेटले पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

देवधरांना अशी खूप उदाहरणे देता येतील की जेथे लाच न दिल्याने अँपलॅबला ऑर्डरी मिळू शकल्या नाहीत. साहजिकच अँपलॅब २०० कोटीपुढे मजल मारू शकली नाही. मात्र तरीसुद्धा या छोट्या कंपनीने निर्मिलेले तंत्रज्ञान जगातल्या कंपन्यांशी टक्कर देऊ शकले या मस्तीचा आनंद त्यांना आजही सुखावतो. नुकसान जास्त कुणाचे; देशाचे की अँपलॅबचे?

**अँपलॅबच्या प्रगतीतील दुसरा अडथळा - सचोटी!**

प्रभाकर देवधरांचे मित्र आणि नातेवाईक त्यांना एक प्रश्न आयुष्यभर विचारत आले की मालाच्या गुणवत्तेबाबत तुमच्या कंपनीचे नाव एवढे मोठे असताना, तुमच्या मालाची पाश्चिमात्य देशांत सतत निर्यात होत असताना, सातत्याने तुम्ही नवनवीन गुणवत्तापूर्ण उत्पादने बाजारात आणत असताना आणि सचोटी हे तुमचे ध्येय असतानाही कंपनी हजार कोटी किंवा त्यापेक्षा अधिकचा व्यवहार का करु शकली नाही? ती वर्षाकाठी २०० कोटीच्या उलाढालीवर का थांबली?

या सगळ्याचे एक उत्तर देवधर देतात ते म्हणजे ”उच्च प्रतीची, भारतात न बनणारी अशी इलेक्ट्रॉनिक उत्पादने निर्माण करण्याचा माझा ध्यास आणि छंद!” ते पुढे म्हणतात “ज्या

संस्कारात मी वाढलो, त्यानुसार केवळ श्रीमंत होण्यासाठी झपाटून जाणे यात मला रस नव्हता आणि नाही. 'पैशासाठी काहीही' अशी माझी वृत्ती कधीच नव्हती. प्रामाणिकपणे आणि सचोटीने व्यवहार करण्यावर माझ्या कंपनीचा सतत भर असतो. सध्याच्या भारतात आडवाटेचे व्यवहार केल्याखेरीज कंपन्यांची डोळ्यात भरणारी प्रगती होत नाही हे सारा समाज जाणतो. पण १९७५ -७६ पर्यंत अॅपलॅबची वाढ झाली ती सरकारी कंपन्यांनी आणि विज्ञान संस्थांनी आमच्या कामावर खुष होऊन दिलेल्या निस्वार्थी प्रोत्साहनामुळेच हे मुद्दाम नमूद केले पाहिजे".

देवधर पुढे सांगतात, "वाममार्गाने जाऊन कंपनी भलीमोठ्ठी करण्याची देशातील प्रचलित पध्दत चोखाळायचा मार्ग मला दिल्लीत सहज उपलब्ध होता. अॅपलॅबची झंझावती वाढ करण्यासाठी अशी संधी मला होती पण संस्कार आणि निश्चय याचे पाठबळ असल्याने असा विचार माझ्या मनात एकदाही आला नाही. देशसुधारण्यासाठी, देशाच्या प्रगतीसाठी माझ्याकडे काही योजना होत्या. आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरून भारतनिर्माण करण्याची ईर्षा होती. राजीव गांधींची मैत्री मला हे करून देणार होती म्हणून अॅपलॅब माझ्या सहकाऱ्यांवर सोडून दिल्लीचा मार्ग मी स्वीकारला. दिल्लीत मिळालेले थोडेफार यश अॅपलॅबच्या आणि माझ्या हुकलेल्या श्रीमंतीपेक्षा मला जास्त समाधान देते. पैशासाठी किंवा नाव कमावण्यासाठी दिल्लीचा वापर करण्याचा विचारही माझ्या मनात एकदाही आला नाही. स्वतःचे मोजमाप स्वतःच करण्यात मला समाधान आहे"

प्रभाकर देवधरांना एकदा मी विचारले होते की "तुम्ही राजीव गांधींच्या इतके जवळ असताना तुम्हाला पद्मश्री, पद्मभूषण अशा किताबती कशा मिळाल्या नाहीत?" त्यावर देवधर म्हणाले होते की "अहो, मी त्या मागायला हव्या होत्या ना? मीच मागितल्या नाहीत तर त्या कशा मिळतील? आणि त्या मिळाल्या असत्या तर मला त्याचा काय उपयोग होणार होता?"

**देशोपयोगी तांत्रिक आणि सामाजिक कार्य**

१९७४ पर्यंतच्या पहिल्या बारा वर्षांच्या अॅपलॅबचा उद्योग उभारण्याच्या प्रयत्नानंतर देवधरांना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवू लागली; देशातील इलेक्ट्रॉनिकस उद्योग चुकीच्या मार्गाने जात आहे. जागतिक बाजारपेठ चालू नीतीमुळे देशाच्या हाताबाहेर गेली आहे. आयातीवर अवाच्यासावा शुल्क लावल्याने देशात निर्माण होणाऱ्या मालाच्या किंमती तैवान आणि हॉंगकॉंगस्थित कंपन्यांपेक्षा तिप्पट असूनही त्यांचा दर्जा गचाळ आहे हे चित्र त्यांना पटेना. शेवटी पूर्ण अभ्यास करून देवधरांनी "इलसट्रेटेड विकली" या टाइम्स ऑफ इन्डिया समूहाच्या त्याकाळच्या अतिशय प्रसिद्ध साप्ताहिकात सरकारी धोरणांवर सडकून टीका करणारा एक लेख लिहिला. त्याची चर्चा होवू लागली. देवधरांचे आणि देशाचे नशीब असे कि तो लेख राजीव गांधी यांच्याही वाचनात आला. ही घटना पुढे देवधरांचे सारे आयुष्यच बदलण्याची नांदी ठरली. राजीव गांधी आणि देवधर या दोघांचेही सामायिक मित्र, कॉस्मिक रेडिओचे मनुभाई देसाई. मनुभाईंनी लवकरच त्या दोघांची भेट घडवून आणली. पाहता पाहता दोघांची ही मैत्री गाढ आणि पक्की होत गेली.

**राजीव गांधी- मित्र आणि विद्यार्थी**

राजीव गांधी इंडियन एअरलाइनसचे पायलट होते. त्यांचा दर आठवड्यात मुंबईमध्ये २४ तास मुक्काम असे. त्यांना इलेक्ट्रॉनिक्सविषयी अतिशय जिज्ञासा होती आणि त्यामुळे देवधर आणि राजीव गांधी यांची मैत्री वृद्धिंगत होण्यास विलंब लागला नाही. दर आठवड्यात



दोन दिवस तरी ते एकत्र असत, अनेक वेळा अँपलॅबमध्ये येत. ते कारखान्यात आल्यावर सर्वत्र मुक्तपणे फिरत असत. कामगार आणि इंजिनिअर लोकांशी बोलून ते तेथे चाललेल्या गोष्टी समजावून घेत असत. ही चार पाच वर्षे देवधर इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटरचे देशासाठी असलेले महत्व राजीव गांधींना पटवून देऊ शकले. १९८० साली बीबीसीचा ‘स्पेक्ट्रम’ हा जगातील पहिलावहिला डिजिटल कॉम्प्यूटर देवधरांबरोबर राजीव गांधींनीही घेतला. १९७५ साली सुरु झालेली मैत्री हळूहळू अधिकच घट्ट होत गेली. कर्मधर्म संयोग असा की पुढे १९८०मध्ये संजय गांधींचा अपघाती मृत्यू झाला. संजय गांधी इंदिरा गांधींना मदत करीत असत. त्यांच्या मृत्यूनंतर इंदिराजींना राजीव गांधींनी मदत करणे जरूर झाले. १९८२ च्या एशियन गेम्स दिल्लीत होणार होत्या त्याची जबाबदारी इंदिरा गांधींनी राजीव गांधी आणि त्यांच्या मित्रांवर सोपवली. देवधरही त्यात गुंतले गेले. केंद्रिय मंत्री वसंतराव साठे यांच्याशी देवधरांचे खूप जमले. बापूसाहेब साठ्यांनी आणि



श्री. देवधर दिल्लीमधील कार्यालयात

देवधरांनी मिळून रंगीत टेलिव्हीजन आणण्यासाठी सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स मंत्रालयाचा विरोध असतानाही इंदिरा गांधींचे मन वळवले. रंगेल वृत्तीच्या साठ्यांनी ‘गरिबांच्या जीवनात रंग भरण्याचे’ अभिनव साकडे इंदिरा गांधींना कसे घातले हे सर्वज्ञात आहेच. देशाच्या समर्थ पंतप्रधानांचा चिरंजीव आहोत याचे त्यांनी कधीही भांडवल केले नाही. देवधर नेहमी म्हणतात की राजीव गांधींच्या या असामान्य अलिप्ततेमुळे, त्याच्या लोभस व दिलदार स्वभावामुळे आणि त्याच्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे देवधर कुटुंबियात आणि मित्रमंडळीत ते सर्वांनाच हवेहवेसे वाटत. नंतर सारा देशच त्यांच्या प्रेमात पडला यात अजिबात आश्चर्य वाटायला नको. इंदिरा गांधींच्या नावे येणारी हजारो पत्रे राजीव गांधी पाहू लागले. त्यात अनेक पत्रे विज्ञान-तंत्रज्ञान-उद्योग वगैरे विषयांवर असत. त्याची उत्तरे देण्यास मदत करण्यासाठी राजीव गांधींनी

देवधरांना मदतीला बोलावले. काम वाढले आणि शेवटी देवधरांचा आठवड्यागणिक शनिवार-रविवारपेक्षा दिल्लीतला मुक्काम वाढत गेला. १९८४ साली देवधर मध्यवर्ती सरकारच्या ई.टी.अँड टी लिमिटेड या उपक्रमाचे अध्यक्ष झाले.

देवधरांनीही लवकरच अँपलॅबचा राजीनामा दिला व ते पूर्णवेळेसाठी दिल्लीत मुक्काम करुन राहिले ते पुढील आठ वर्षासाठी. या सर्व काळात, आधी खाजगीत आणि नंतर अधिकृतपणे, ते राजीव गांधींचे तांत्रिक सल्लागार होते. मुंबईत श्री. सुभाष जोशी अँपलॅबचे प्रमुख झाले. देवधरांनी अँपलॅबमधील सगळय़ांना सांगितले होते की दिल्लीत जेथे जेथे त्यांचा संबंध आहे तेथल्या ऑर्डर्स अँपलॅबने घ्यायच्या नाहीत. देवधरांची नैतिकता कंपनीच्या वाढीच्या आड येत असे ती अशी.

**भारताच्या इलेक्ट्रॉनिक्सचे धोरण अमुलाग्र बदलण्याची अचानक संधी**

१९८२ सालच्या डिसेंबरमधील बावीस तारीख. देवधर राजीव गांधींच्या खोलीत बसून इलेक्ट्रॉनिक्स मिनिस्ट्रीच्या त्या दिवसातल्या निर्णयांवर टीका करत होते. अचानक इंदिरा गांधी तेथे आल्या. तेव्हा थोड्या थट्टेच्या स्वरात राजीव गांधी म्हणाले, “ममा, प्रभू तुझ्या इलेक्ट्रॉनिक्सच्या धोरणावर टीका करीत आहे.” त्यावर इंदिरा गांधी हसून देवधरांना म्हणाल्या, “तुमच्या मते काय चुकतंय, काय बदल हवा”? त्यावर देवधर म्हणाले, “तुम्हाला वेळ असेल तेव्हा तुम्ही मला तासभर द्या, मग मी सविस्तर बोलेन.” पण एखादा दिवस दूरगामी बदलाची नांदी ठरतो. इंदिरा गांधींनी समोरच असलेल्या सोफ्यावर बैठक मारली आणि हसून म्हणाल्या, ”मला आत्ता वेळ आहे, आत्ताच बोला”. त्यावर मग देवधरांनी त्यांना `भारतातला इलेक्ट्रॉनिक्सचा व्यवसाय कसा वाढत जाणारा आहे, जगात हा व्यवसाय कशी आघाडी घेत आहे, भारत या व्यवसायात कशी प्रगती करु शकेल, त्यासाठी आपण त्याला कसे प्रोत्साहन दिले पाहिजे आणि त्यामुळे सध्या (१९८२-८३) बाराशे कोटीचा असणारा हा व्यवसाय आणखी सातआठ वर्षात कसा झपाट्याने वृदिंगत होईल व त्यासाठी आपल्या इलेक्ट्रॉनिक्सच्या धोरणात कसा बदल केला पाहिजे` सरकारी नियंत्रणापासून असे उत्पादन मुक्त करण्यात अनेक फायदे कसे हे सविस्तरपणे सांगितले. यावर इंदिरा गांधी त्यांना म्हणाल्या, “तुम्ही मला नव्या धोरणाविषयी एक सविस्तर खर्डा लवकरच लिहून द्या.” देवधरांना वाटले एरवी पुढारी लोक तोंडदेखले बोलतात, तसेच हे असणार. पण बरोबर एक महिन्यांनी पंतप्रधानांचे त्यावेळचे उपसचिव गोपी अरोरा यांचा देवधरांना फोन आला, की `तुम्ही मॅडमना काही खर्डा पाठवणार होतात, त्याचे काय झाले?` मग मात्र देवधरांना जाणवले की, इंदिरा गांधी याबाबत गंभीर आहेत व त्यांनी त्यानंतरच्या एक



१९८५च्या अमेरिकन भेटीत जॉर्ज शूल्टज् - सेक्रेटरी ऑफ स्टेट व अध्यक्ष पेप्सी यांच्याशी चर्चा करताना श्री. देवधर

महिन्यात इंदिराजींना नवे धोरण कसे असावे ते लिहून पाठवले. यावर चर्चा होऊन इंदिरा गांधींनी २५ ऑगस्ट,१९८३ रोजी ते धोरण जवळजवळ जसेच्या तसे स्वीकारून नवीन नीती जाहीर केली. हा देवधरांचा दिल्लीतला सगळ्यात मोठा विजय! १९८९-९० साली या क्षेत्रात किती वाढ झाली, हे पहायला इंदिरा गांधी नव्हत्या, पण देवधरांनी अंदाज केला त्याप्रमाणे देशाचा इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील उत्पादन १९८९-९० साली ९४०० कोटींचा झाला.

**सॅम पित्रोडा**

सॅम आणि देवधर यांच्या संबंधाविषयी देवधर सांगतात;

“१९८१ ऑगष्टमध्ये सॅम पित्रोडाने इंदिराजींना लिहिलेले पत्र त्यांनी माझ्याकडे मतासाठी दिले. पत्रात त्यांनी भारतात येऊन छोट्या इलेक्ट्रोनिक डिजिटल एक्सचेंज बनवण्याचे तंत्रज्ञान विनामुल्य देण्याची इत्छा त्याने प्रकट केली होती. भारतीय खेड्यातील वातावरणातही टिकतील असे हे तंत्रज्ञान आहे, त्याला एअरकंडीशनिंग जरूर नाही अशी हमीही त्यात होती. सॅमविषयी माझ्या शिकागोनिवासी मित्रांकडून माहिती मिळवून नंतर मी त्या सुचनेविषयी पूर्णपणे अनुकूल असे मत इंदिराजींना दिले. पण सॅमला भारतात तो प्रकल्प सुरु करण्यासाठी मात्र ऑक्टोबर १९८४ पर्यंत वाट पहावी लागली!”

“त्याचे असे झाले. सॅम हे तंत्रज्ञान विनामुल्य देत असल्याने सॅम स्वतःचा व्यवसाय सोडून भारतात का येतोय या विषयी एक मुलभूत शंका पंतप्रधानांच्या कार्यालयाने इंदिराजींच्या कानावर घातली. त्याकाळात इंदिराजींच्या राजकीय विचारात अमेरिकेविषयी संशयाचे वातावरण होते. टेलेकम्युनिकेशन क्षेत्रात असलेले धोके लक्षात घेता या क्षेत्रात अमेरिकेला चंचुप्रवेशही देण्याचा विचारही होणे शक्य नव्हते. फुकटात हे आधुनिक तंत्रज्ञान सॅम का देतोय? माझ्या कानावर असे आले की इंदिराजींचे प्रमुख राजकीय सल्लागारांना सॅमच्या दिल्लीला येण्यात सीआयएचा संबंध असावा असा दाट संशय होता. सरकारी टेलीकॉम विभागाचाही सॅमच्या प्रकल्पाला सख्त विरोध होता. त्यामुळे तीन वर्षे सॅमचे स्वप्न अधुरे राहिले. दरम्यान इंदिराजींनी अमेरिकेत जाऊन सॅमविषयी अधिक माहिती मिळवण्यास मला सांगितले. त्यात मला सॅम भारतात का येऊ पहात आहे याचे खरे उत्तर मिळाले. सॅमने त्याच्या कंपनीत निर्माण केलेले आणि चीनला निर्यात केलेले हे तंत्रज्ञान अमेरिकेतील एक मोठ्या टेलीकॉम कंपनीला खूप मोठ्या किमतीत विकले होते आणि त्या करारात त्या क्षेत्रात काही वर्षे धंदा न करण्याची अट होती. त्यामुळे भारतात स्थाईक होऊन ते तंत्रज्ञान देशाला फुकट देणे त्याला शक्य होते; परवडणारे होते. तोही खुलासा मी इंदिराजीकडे केला पण परिस्थिती बदलली नाही.”

“पुढे राजीव गांधी यांच्या मध्यस्ती नंतर ऑगष्ट १९८४मध्ये टेलिकॉम मंत्रालयातील तंत्रज्ञांच्या विरोधाला न जुमानता स्वतंत्र ‘सीडॉट’ संस्था निर्माण करण्यात आली. तीन कोटी आणि तीस महिन्यात क्रमाक्रमाने ५०० ते १०,००० लाईन्सची खेड्यातही चालू शकतील अशी रुरल डिजिटल एक्सचेंज निर्मितीचे काम देण्यात आले. सॅम पित्रोडाने आपल्या भारतीय तंत्रज्ञांच्या मदतीने या संधीचे सोने केले. १९८५च्या अखेरीस भारतातील टेलीकॉम सुविधा अमुलाग्र सुधारण्यास सुरुवात झाली. आजवर तंत्रज्ञानाची ही घोडदौड बेलगाम चालूच आहे!”

देवधर पुढे म्हणतात, “हुशार आणि महत्त्वाकांक्षी सॅमने दिल्लीत लवकरच आपला जम बसवला. संभाषण कुशल सॅमने अनेकांची मने जिंकून घेतली. टेक्नोलॉजी मिशनचा प्रमुख झाल्यावर तो देशभर फिरत असे, भाषणे देत असे आणि त्यातून त्याच्या चाहत्यांची संख्या सर्वत्र वाढली. त्याची महत्वाकांक्षा निराळी होती. मला मात्र दिल्लीतील वातावरणाची उबग आली होती. पूर्वी जसे दिल्लीतील वातावरणात उबगलेले पु.ल. देशपांडे दिल्ली सोडून पुण्यात परतले तसेच माझेही संधी मिळताच परतण्याचे ठरले होते त्यामुळे राजीव गांधी १९८९च्या डिसेम्बरमध्ये निवडणूक हरल्यावर मी माझा बंगला सोडून मुंबईला परत येण्याचे नक्की केले. सॅम मला भेटायला आला. माझा निर्णय ऐकून तो म्हणाला, “प्रभू, मी राजीव साठी दिल्लीत आलो नाहीये, मी नव्या सरकारबरोबर माझे काम करत राहणार. पण नवे सरकार त्याला राजीवचा मित्र मानत होते त्यामुळे त्याला नव्या सरकारने प्रचंड त्रास दिला. शेवटी त्याची प्रकृती ढासळली, हार्ट अटॅक आला. एस्कोर्टमध्ये बायपास झाले आणि तो सारे सोडून अमेरिकेला परत गेला.”

देवधरांनी १९८३ साली लिहिलेल्या इलेक्ट्रॉनिक्स धोरणातील खूपशा गोष्टींची तामिली मात्र पुढे हवी तशी झाली नाही, होत नाही असे त्यांना आढळून येत गेले. पण तरीही त्या धोरणामुळे पाच गोष्टी घडल्याचे समाधान त्यांना वाटत होते. १) देशात इलेक्ट्रॉनिक्सच्या रोजच्या घरगुती वस्तुंच्या वापरात झालेली अपरंपार वाढ. अशिक्षितांना मिळालेला रंगीत टेलीव्हिजनचा लाभ. दोन. इलेक्ट्रॉनिक्स उद्योगातील भांडवली गुंतवणूक वाढली. आणि तीन, आयातीवरील निर्बंध उठवल्याने लोकांना परदेशच्या चांगल्या गुणवत्तेच्या वस्तू विकत घेता येऊ लागल्या.

त्याचबरोबर ज्या गोष्टी घडल्या नाहीत म्हणून खंत वाटली त्या अशा. एक. जगाच्या तुलनेत वाढ होऊनही देशातील इलेक्ट्रॉनिक उद्योग जागतिक उद्योगाच्या एक टक्का एवढाच राहिला.

२) देशातील संगणक सोफ्टवेअर कामाची निर्यात अब्जावधी डॉलरची झाली असली तरी त्याला लागणारे जवळजवळ १००टक्के हार्डवेअर मात्र देशात बनत नाही, ते सर्व आयात होते.

३) भारतात अनेक प्रकारच्या परवानग्या मिळायला वेळ लागत असल्याने परदेशी गुंतवणूक क्षुल्लक प्रमाणात झाली. ४) आपले आयात धोरण अपेक्षेप्रमाणे बदलले पण चीन प्रमाणे कोणत्याही परदेशी कंपनीने आपल्याकडे भांडवल गुंतवणूक करून उद्योग सुरु केला नाही. या बाबत चीनच्या धोरणांचा अभ्यास करण्यासारखा आहे. चीनने आपले आयात धोरण बदलल्यावर तैवानच्या आणि हॉगकॉगमधील उद्योगांनी चीनमध्ये आपली उद्योगवाढ मोठ्या प्रमाणात सुरु केली. सुरुवातीला चीनने स्वस्तात उपलब्ध होणारे चिनी कामगार या उद्योगांना पुरवले. माल स्वस्तात बनवून घेण्यासाठी जगातील बहुतेक साऱ्या बहुदेशीय कंपन्यांनी चीन मध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक केली. त्यांच्याकडून चीनी कारागीरांना जागतिक दर्जाचे काम करण्याचे शिक्षण मिळाले. त्यामुळे आज चीनी कर्मचाऱ्यांची उत्पादकता आपल्या लोकांपेक्षा कितीतरी अधिक आहे. ५) सॉफ्टवेअर उद्योगात संगणक आणि सेमी कंडक्टर उद्योगांनी आपल्याला एक चांगली संधी दिली होती पण आपण ती गमावली. १९८७ साली संगणकाची किंमत दहा हजार रुपयांखाली आणावी म्हणून विप्रो आणि एचसीएल उद्योगांशी देवधरांनी खूप चर्चा केली. पण त्या लोकांनी यात उत्साह दाखवला नाही. शेवटी देवधरांनी ई. टी. अँड टी द्वारा ते करून दाखवले.

## इलेक्ट्रॉनिक आयोगाचे अध्यक्ष -१९८६ ते १९८८

राजीव गांधींनी देवधरांना राज्यमंत्र्याचा दर्जा देऊन इलेक्ट्रॉनिक आयोगाचे अध्यक्षपद बहाल केले. आयोगाचे अध्यक्ष झाल्यावर देशात इलेक्ट्रॉनिक्सच्या व्यवसायाची भरभराट करण्यासाठी व त्याची निर्यात वाढवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्सचा पुरेसा वापर करुन व देशात पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात, ज्यामुळे हा व्यवसाय भरभराटेल व निर्यातही वाढेल, या उद्योगासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करणे, संशोधनासाठी प्रोत्साहन देणे, त्याचा फायदा समाजाला करुन देणे, देशातील



इलेक्ट्रॉनिक आयोगाचे अध्यक्ष - १९८६ ते १९८८

संदेशवहन सुधारणे, देशाच्या ग्रामीण भागातील गरीबांना शेतीबध्दल हवी असलेली माहिती सहजी उपलब्ध करुन देणे इत्यादी मुलभूत गोष्टीत त्यांना खरा रस होता. यासाठी जगात काय घडते यावर लक्ष ठेवून ते आपल्याकडे कसे आणता येईल हे देवधरांना पहायचे होते. उद्योगांवर बंधने आणण्याऐवजी त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे हे देवधरांनी राजीव गांधींना आधीच पटवून दिले होते. एका ठरीव मार्गाने सगळय़ांना जायला लावण्याऐवजी त्यांना मुक्तपणे प्रगती करायची संधी देणे आणि नोकरशहांच्या ताब्यात सर्व अधिकार देण्याऐवजी गरीब आणि प्रामाणिक लोकांना संरक्षण देणे देवधरांना महत्वाचे वाटे. देवधरांचे म्हणणे, त्यांच्यासारखा २५ वर्षे त्या उद्योगात काम केलेला माणूसच त्यावर अधिकारवाणीने बोलू शकतो. सोनी कंपनीचे प्रेसिडेण्ट किकुची यांनी आपल्या `जॅपनीज इलेक्ट्रॉनिक्स` या पुस्तकात लिहिले आहे की उच्च पदावरून अवलोकन करतांना जमिनीवर नेमकं काय चाललंय, प्रगतीच्या मार्गात काय अडचणी आहेत याचा अंदाज येत नाही, त्यासाठी मैदानात उतरले पाहीजे. देशातील इलेक्ट्रॉनिकस उद्योगाला नवीन दिशा देण्याचे काम त्यांनी समर्थपणे आणि गाजावाजा न करता केले हे जाणकार सांगतात.

## माहिती आणि तंत्रज्ञानावरील भारताचा जोर

सप्टेम्बर १९८६ साली देवधरांनी पंतप्रधान राजीव गांधींच्या सूचनेवरून “देशाने माहिती आणि तंत्रज्ञानावर का जोर द्यावा” याविषयी एक मोनोग्राम तयार केला व तो सर्व मंत्र्यांना देण्यात आला. त्याचा सारांश असा. संगणक आणि संदेशवहनाची उपकरणे कोणत्याही देशाच्या भविष्यावर प्रभाव पाडणारी असल्याने त्याकडे विशेष लक्ष द्यायला हवे. येवू घातलेल्या इतर कोणत्याही तंत्रज्ञानापेक्षा या दोन क्षेत्रातील उपकरणे लोकांच्या घरच्या आणि कार्यालयातील कामावर प्रभाव टाकणारी आहेत. सरकारचे व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करण्यासाठीही हे मोठ्या प्रमाणात करावे लागेल. अमेरिकेप्रमाणेच रशिया आणि इतर देशांनीही याबाबत केलेली प्रगती पाहिली तर हे केवळ पाश्चिमात्यांचे फॅड नसून ती जागतिक गरज होत चालली आहे, नव्हे ते टाळता येणे अशक्य ठरणार आहे. संगणक हे पुढील आयुष्यात घडून येणाऱया बदलाचे सूचक आहेत. कोणताही बदल हा सुरुवातीला क्लिष्ट वाटतोच हे खरे असले तरी त्याला आपल्याला तोंड

द्यावेच लागणार आहे हे निश्चित. पुढील दहा वर्षात आपल्याला या नवीन तंत्रज्ञानात सुसज्ज झाले पाहिजे. खरे म्हणजे आपल्याला आलेली ही जाग उशीराने आली आहे. आपल्यापुढे बरीच राष्ट्रे गेली आहेत. त्यांच्या अनुभवापासून आपल्याला काही शिकायला हवे. मात्र भारताने याबाबत केलेला उशीर एका परीने भारताच्या फायद्याचा ठरलाय कारण संगणकाच्या किमती उतरल्या असून सातत्याने पुढील काळात उतरतच राहतील. भारत याबाबत खूप सृजनशील असुन एक दिवस 'डॉस' सारखी आपलीही प्रणाली आपण निर्माण करू शकू. भारतात आपल्याला स्वभाषेतून संदेशवहन करता येईल. संगणकाचा उपयोग जलवहातूक, मोटारकार डिझाईन, विमान उद्योग, रोगनिदान व उपचार, नवनवीन पदार्थ (मटेरियल) तयार करणे, हवामानाचा अंदाज व्यक्त करणे आर्थिक व्यवहार, ग्रामीण विकास या सर्वात होईल. (देवधरांचे हे १९९० सालचे सर्वच विचार किती दूरदृष्टीचे आहे हे पाहून अचंबा वाटतो.) पुढे बँकेत संगणक वापरायला सुरुवात झाली आणि बँक कर्मचाऱ्यांचा त्याला विरोध आहे असा प्रचार होवू लागला. देवधरांना बँक कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे अध्यक्ष बगाराम तुळपुळे भेटले आणि चर्चा केल्यावर संगणकाची अनिवार्यता त्यांना पटली. पुढे बगाराम तुळपुळे यांनी पहिल्या व्ही.व्ही.गिरी स्मृती व्याख्यानात जोरदारपणे सांगितले की संगणकीकरण टाळणे शक्य नाही आणि इष्टही नाही. संगणकाचा उपयोग संरक्षण खाते, अवकाश संशोधन खाते, राष्ट्राचा आर्थिक विकास साधण्यासाठी लागणारी माहीती व आकडेवारी जमा करणे, खात्रीशीर आणि वेगवान संदेशवहनासाठी, कारखान्याच्या स्टोअरमधील मालाचा हिशेब ठेवणे, उत्पादन पातळी, यंत्रांची देखभाल वगैरे अनेक गोष्टींसाठी होऊ शकेल.

देवधर लिहितात, "कोणत्याही नवीन गोष्टीला केवळ भारतातच नव्हे तर जगात सगळीकडे विरोधच होत आला आहे. शिवणयंत्र पहिल्यांदा इटलीत आले तेव्हा हाताने शिवणकाम करणाऱ्या लोकांनी त्याला विरोधच केला होता. का तर शिंपी बेकार होतील. पण हे यंत्र लोकप्रिय होऊन लोक वापरु लागल्यावर पूर्वीपेक्षा अधिक शिंप्यांची गरज पडली. त्यांची संख्या आणि मिळकत वाढली. संगणकाचा वापर करण्यासाठी त्याबद्दलच्या व्यावसायिक माहितीची जरूर नाही. मोटार चालकाला जसे गाडीच्या बॉनेटखाली काय आहे हे जाणणे जरूर नाही तसेच संगणकाच्या अंतरंगात काय चालते आहे ते वापरणाऱ्याला ठाऊक असण्याची जरूर नाही. संगणकासाठी लागणारे सॉफ्टवेअर तयार केल्यास भारताला जगाच्या पुढे रहाता येईल. अमेरिकेत आणि पश्चिम यूरोपात भारतीय तंत्रज्ञांनी ज्या गतीने यश मिळवले आहे ते पहाता प्रत्यक्षात असे होणे अवघड नाही. या गोष्टी आपण गांभीर्याने घेतल्या नाहीत तर इतर काही गोष्टीत जसे आपण तैवान, दक्षिण कोरिया आणि हाँगकाँगच्या मागे पडलो तेच संगणक सॉफ्टवेअर क्षेत्रातही होईल. आपल्याकडे विज्ञान, गणित आणि इंग्रजी जाणणारी तरुण मुले अमेरिकेच्या एक दशांश पगारात उपलब्ध आहेत. आपल्या लोकांचे संगणकात जसे डोके चालते त्यामुळे अमेरिकेत व पश्चिम यूरोपात भारतीयांची मान उंचावली आहे. या क्षेत्रात आपला उशीरा प्रवेश झाला असला तरी इतरांच्या चुकांपासून आपल्याला बोध घेता येईल. पॅसिफिकच्या आजूबाजूच्या देशांनी संगणक बनवण्यात (हार्ड वेअर) जो पुढाकार घेतला आहे, त्याऐवजी त्याचे सॉफ्टवेअर आपण बनवू शकतो."

१९८८ साली इलेक्ट्रोनिक्स कमिशनने पुणे, बंगलोर, हैदराबाद आणि भुवनेश्वर येथे चार सॉफ्टवेअर पार्कस बनवले. अमेरिका आणि यूरोपियनांच्या व आपल्या वेळेत जो सहा ते बारा तासांचा फरक

आहे, त्यामुळे आपल्याला हे पार्क २४ तास वापरता येऊ लागले. सर्वांना संगणक मुक्तपणे घरी वापरता यावा यासाठी देवधरांनी ई. टी. अँड टी. द्वारा १०,००० रुपयात मिळणारा आय. बी. एम. पीसी तरुण वर्गासाठी बाजारात आणून त्याच्या किंमती अर्ध्यावर आणून एक इतिहास घडवला. या सगळ्या प्रयत्नांचे फल मात्र देवधरांनी १९९० साली दिल्ली सोडल्यानंतर देशाला लाभले. गाजावाजा न करता केलेले देवधारांचे हे कार्य फारच थोडे लोकच जाणतात.

एप्रिल,१९८९ मध्ये जर्मनीमधील हॅनोव्हर येथे दरवर्षी 'सेबिट' नावाचे एक आंतरराष्ट्रीय माहिती तंत्रज्ञानाच्या उपकरणांचे प्रदर्शन भरते. या प्रदर्शनाला भारतातल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील पासष्ट सॉफ्टवेअर कंपन्यांच्या प्रमुखांचे एक शिष्टमंडळ देवधरांच्या नेतृत्वाखाली हॅनोव्हरला गेले होते. त्यावर्षी भारत सेबिट प्रदर्शनातील एक सहभागी देश होता. उद्घाटन पंतप्रधान राजीव गांधी यांनी दिल्लीहून उपग्रहाच्या मदतीने इंटरकॉन्टेनेटल टेले कॉन्फरन्सिंग पद्भतीने केले.

**दिल्लीतल्या लाचखाऊ कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव**

१९८५ मध्ये देवधरांनी भारत सरकारला टेलिव्हजन संचासाठी लागणाऱ्या रंगीत टीवी टय़ूब मागवण्यासाठी आणि परदेशी गंगाजळी वाचवण्यासाठी ई.टी.अँड टी. द्वारा जागतिक निविदा मागवल्या. तोपर्यंत ई.टी.अँड टी एका टय़ूबला ७६ अमेरिकन डॉलर देत असे. ही गोष्ट संशयात्मक आहे हे देवधरांनी जाणले आणि पाच लाख टय़ूबची एक मोठी निविदा काढली. त्यामुळे परदेशी बाजारपेठेत एकच खळबळ उडाली. जपान, दक्षिण कोरिया, फ्रांस अशा अनेक देशातील उत्पादकांनी यात भाग घेतला. देवधरांचा अंदाज खरा ठरला. आलेल्या निविदात सगळय़ात कमी भाव होता फक्त ६४ डॉलर. या परदेशी कंपनीशी केलेल्या प्रत्यक्ष चर्चेत तो भाव ६३ डॉलरवर त्यांनी आणला. त्यामुळे भारताचे एका फटक्यात ६० लाख डॉलर वाचले! या पध्दतीने १९८९ सालापर्यंत असे पैसे वाचवणे चालू राहीले. पहिले टेंडर पूर्ण झाल्यावर टय़ूब पुरवलेल्या एका कंपनीचा प्रतिनिधी देवधरांकडे आला. देवधरांना तो म्हणाला, "मी तुमच्यासाठी दरेक टयूबमागे एक डॉलर ठेवला आहे. ते ५०,००० डॉलर्स आपल्याला कसे देऊ?" चकित झालेल्या देवधरांनी इ.टी,अँड टी.चे अर्थ संचालक पात्रो यांना बोलावले आणि शांतपणे सुचवले ही कंपनी इ.टी.अँड टी.ला आणखी एक डॉलरची सवलत देत आहे, ते पैसे इ.टी,अँड टी.ने कसे घ्यायचे ते पहा. त्यावर पात्रोहि चकित झाले. त्याच दिवशी संध्याकाळी त्या व्यक्तीने देवधरांची माफी मागितली. तो म्हणाला, "ऑर्डर मिळवण्यासाठी असे द्यावे लागतात असे मला सांगण्यात आले होते. मला वाटले असा रिवाज असावा." तो घाबरलाही होता की आता त्याचे काय होईल? तेव्हा देवधरांनी त्याला आश्वासित केले की "तुम्ही सरकारचे पैसे वाचवले, याचा मला आनंदच आहे. काळजी करू नका मी पोलीस नाहीये." अशा बातम्या दिल्लीत फार झटकन पसरतात. त्यानंतर कोणालाही देवधरांना लाच देण्याची हिम्मत झाली नाही. पात्रो मात्र यामुळे भारावून गेले. नंतर लवकरच देवधर जेव्हा इलेक्ट्रॉनिक्स आयोगाचे अध्यक्ष झाले तेव्हा त्यांनी इटी अँड टीच्या वित्त संचालकपदाचा राजीनामा दिला व ते देवधरांचे खाजगी सचिव झाले. पात्रो मुरलेले सनदी अधिकारी होते. देवधरांच्या स्पष्ट वक्तेपणा आणि सडेतोड वृत्ती दिल्लीच्या वातावरणात त्यांना त्रासदायक होवू शकेल हे जाणून पात्रोंनी देवधरांना दिल्लीतल्या नोकरशाहीतील भ्रष्ट नितीपासून संरक्षण दिले. स्वच्छ देवधरांना दिल्लीत कुठल्याही

राजकीय ‘चाली’मुळे अपाय होणार नाही हे त्यांनी त्यांचा पुढे झालेल्या अकाली मृत्यूपर्यंत संभाळले. पण देवधरांची अशा प्रकारची ख्याती अँपलॅबच्या अनेक सरकारी ऑर्डर्स गमावण्यात झाली !

**लहान व मध्यम उद्योगांची तंत्रज्ञान अधिष्ठीतता आणि भ्रष्टाचाराचे भूत**

पन्नास वर्षांच्या व्यावसायिक अनुभवातून देवधरांच्या ध्यानात एक गोष्ट पक्की आली की, भारतात एखाद्या व्यवसायाची नेत्रदीपक वाढ करायची असेल तर भ्रष्टाचार, लाचलुचपत आणि कर अधिकाऱ्यांच्या बरोबर साटेलोटे करणे मालकाला आवश्यक असते. समोरच्या माणसाला तुम्ही जेवढे अधिक खूष कराल तेवढे तुमचे यश मोठे. देवधरांचा अनुभव असा आहे की, १९९० पासून देशातील भ्रष्टाचारात दर वर्षी वाढ झाली असून देशाच्या गलथान कारभारामुळे ती आजच्या भीतीदायक अवस्थेपर्यंत येऊन पोहोचली आहे. भ्रष्टाचार हा लहान-मोठय़ा, देशी अथवा बहुराष्ट्रीय कंपन्यांसमोरही उभा ठाकलेला राक्षस आहे. यामुळे विशेषतः तंत्रज्ञ लोकांनी उत्साहाने सुरु केलेल्या छोटय़ा कंपन्यांची ही आज एक मोठी डोकेदुखी झाली आहे. अगोदरच त्यांना अशा व्यवसायातून मिळणारा नफा हा फार नसतो आणि त्यात या सरकारी भुतांना खूष करता करता त्यांच्या नाकी नऊ येतात. कधी कधी ते यामुळे तोटय़ातही जातात. अगोदरच पैसे जमा करणे, प्रशिक्षण, उत्पादनाचे तंत्रज्ञान, पायाभूत सोयींचा अभाव आणि उत्पादनाच खप वाढवण्याचे प्रयत्न या साऱ्यामुळे बेजार झालेला हा लघुउद्योजक, लाचलुचपतीमुळे कोलमडून पडतो. वस्तुतः अँपलॅबने हजारासारख्या संख्येने अशिक्षित आणि अर्धशिक्षित लोकांना कामाची दिलेली संधी असूनही भ्रष्टाचार न केल्याने अँपलॅबलाही खिळखिळे केले. भ्रष्टाचार हा सरकारी लोकांना पैसे चारण्यामुळे होतो असे नसून तो दुतर्फी होतो. बरेच कारखानदारही दुय्यम प्रतीचा माल बनवतात किंवा सरकारी गिर्हाईकांच्या संगनमताने कमी प्रतीचा माल पुरवतात. व्यापारीही सरकारी अधिकाऱ्यांच्या मदतीने कधी बाजाराला माल न पुरवता साठवून ठेवतात व कृत्रिम टंचाई निर्माण करुन किंमती वाढवतात.

देवधर म्हणतात, “अत्यंत कमी साधने व पैसा उपलब्ध असतानाही, बऱ्याच हुशार तंत्रज्ञांनी अत्यंत बिकट परिस्थितीतून मार्ग काढत काढत नवनवीन उत्पादने देशात निर्माण केली आहेत पण तरीही त्यांना त्यांच्या व्यवसायाची वाढ करायला परिस्थितीशी मोठा सामना करावा लागतो. त्यांच्या उत्पादनाचा देशाला मोठा फायदा झालेला असतानाही त्यांना कुठल्याही प्रकारचे प्रोत्साहन देण्याचे कधी सरकारच्या मनातही येत नाही.” देवधर देशातील इलेक्ट्रॉनिक्स साधन निर्मितीच्या धंद्यातले मूळपुरुष असल्याने त्यांच्या सुरवातीच्या जडण-घडणीच्या काळात बी.इ.एल, इस्रोसारख्या सरकारी संस्थांनी तांत्रिक कामे देऊन खूप प्रोत्साहन दिले. चीन, अमेरिका, इस्रायलसारख्या देशात अशा लोकांना प्रोत्साहन देण्याच्या सरकारी योजना अस्तित्वात आहेत. अशा कंपन्यांना ‘पायोनियर’ असा दर्जा देऊन सरकारी खरेदीत त्यांना प्राध्यान्य देण्याची त्या देशात पध्दत आहे. ते आपले सरकार करत नाही हे आत्मघातकी आहे. साहजिकच भारत तंत्रज्ञानाबाबत मागासलेला रहात आला आहे. आपण नवीन काय शोधले हे सांगण्यासाठी आपल्याकडे दरवर्षी सायन्स काँग्रेस भरते. पण तंत्रज्ञांनी काय नवीन विकसित केले आहे हे सांगण्यासाठी आपल्याकडे “टेक्नॉलॉजी काँग्रेस” मात्र भरत नाही हे आपले दुर्दैव आहे. खरे म्हणजे सरकारने केलेल्या एका पहाणीत त्यांना असे आढळून

आले आहे की, या छोटय़ा उद्योजकांच्या कामाचा देशाला मोठा फायदा झाला आहे. या लघुउद्योजकांनी संशोधन आणि विकासात फारच लहानशी गुंतवणूक केलेली असते पण त्यांचे काम वाखाणण्यासारखे असते. मोठे उद्योग तंत्रज्ञान परदेशातून आणतात,तंत्रज्ञान निर्मितीत पैसा गुंतवत नाहीत. आज देशात माहीती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड मोठ्या कंपन्या प्रचंड फायदा करतात पण त्याही संशोधन आणि विज्ञानविकासावर काहीही पैसा गुंतवत नाहीत. त्यांनी स्वतः विंडो किंवा अँड्रॉइड वगैरेसारख्या कुठल्याही सोफ्टवेअर प्रणाल्या विकसित करुन स्टीव्ह जॉब्स किंबा बिल गेटससारखे लाखो लोकांना त्याच्या प्रती विकून जगभर नाव केले नाही. त्या श्रीमंत असल्याने त्याचा उदोउदो होत असला तरी तांत्रिक आणि अभियांत्रिकी तरुणांचा वेळ विकण्यापलीकडे या कंपन्यांनी पैशाची आणि गुणवत्तेची कमतरता नसतानाही एकही सॉफ्टवेअर प्रॉडक्ट निर्माण केला नाही हे दुर्दैव.

**राजीव गांधी, देवधर आणि देशाचे राजकारण**

देवधर राजीव गांधींना नेहमी असे सांगत असत की, तुम्हाला या देशाचा नेता म्हणून जास्तीत जास्त लोकांचा पाठींबा आहे, कारण तुम्ही देशातील साऱ्या राज्यातील बहुभाषी लोकांपासून आणि धर्म व जातींपासून तितकेच जवळ वा तितकेच दूर आहात. म्हणजे दिल्लीतल्या बाकी सगळय़ा नेत्यांसारखे तुम्ही राज्य स्तरावरचे नेते म्हणून ओळखले जात नाही. तुम्ही दिल्लीत जमा झालेल्या इतर नेत्यांप्रमाणे त्या त्या राज्याचे प्रतिनिधी नाहीत किंवा केवळ हिंदुंचे वा मुस्लिमांचे नेते नाहीत. तुम्ही  एकटेच भारतीय नेते आहात. आपण राष्ट्रीय नेते आहोत असे इतर नेते म्हणवून घेऊ शकत नाहीत. सोनिया गांधी आणि त्यांच्या मुलांना आज हा फायदा मिळतो. नरेंद्र मोदी किंवा इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबाबत असे म्हणता येत नाही.

देवधर म्हणतात, “राजीव गांधींच्या मंत्रीमंडळात असलेल्या अनेक मंत्र्यांना त्यांच्या खात्याच्या कामाबध्दल माहीती (डोमेन ज्ञान) असायची नाही. यावर उतारा  म्हणून राजीव गांधींनी त्यांच्या कारकीर्दीत २७  वेळा त्यांच्या मंत्रीमंडळात बदल केले. त्यांच्या मंत्रीमंडळात आपले रेल्वेमंत्रीपद पाचही वर्षे टिकवून ठेवणारे माधवराव सिंदिया हे एकमेव मंत्री होते. अशा परिस्थितीत गोंधळापेक्षा आणखी काय होणार? राजीव गांधींच्या काळातच आपली आर्थिक परिस्थिती एवढी बिघडली की त्यांच्या नंतर वर्षा-दीड वर्षातच आपण दिवाळखोरीच्या उंबरठय़ाजवळ जाऊन पोहोचलो आणि नरसिंह रावांच्या काळात देशाला सोने गहाण ठेवावे लागले होते.”

**देवधरांचा दिल्लीतला अनुभव**

देवधरांचा दिल्लीतला आठ वर्षाचा अनुभव काही त्यांना सुखावह वाटला नाही. त्या आठ वर्षात त्यांना दिल्लीत एकही मंत्री किंवा वरीष्ठ सचिव राष्ट्र उभारणीच्या कामात रस असलेला सापडला नाही. देशाच्या प्रगतीसाठी दीर्घ काळ नियोजनबद्‌भ काम बिनचुकारपणे दूरदृष्टी ठेऊन करावे लागते. पण अशी शिस्त, काटेकोर नियमन आणि दूरदृष्टी त्यांना कुठेच दिसली नाही. चोखंदळपणे निवडलेले सनदी अधिकारी नक्कीच हुशार आणि तैल बुद्धीचे होते पण त्यांच्यातही देशबांधणीचा जोश नसे. राष्ट्राच्या भल्यापेक्षा त्यांना स्वतःची प्रगती, स्वतःचे पुढले पोस्टींग यात जास्त रस असे. बहुतेक सनदी नोकरांना विभागाच्या मुख्य सचिव पदापर्यंत पोहोचल्यावर निवृत्त

व्हायला वर्षभराचा काळ बाकी असे. निवृत्तीनंतर आपली सोय कोठे करायची याच्या तजवीजीत त्यांचा वेळ जात असावा. त्यामुळे ते देशाच्या भवितव्याचा विचार करीत नव्हते तर स्वतःच्या भवितव्याचा विचार करीत होते. राजकारणी लोकही मतलबी होतेच पण त्यांनाही देश कसा विकसित करायचा याची नजरच नव्हती. त्यांची नजर त्यांच्या स्वतः पुरती त्यांच्या मुळराज्यापुरती, त्यांच्या मतदार संघापुरती वा त्यांच्या जातीपुरती मर्यादित होती.

सध्या सगळीकडे रोज फक्त भ्रष्टाचाराच्याच बातम्या वाचायला मिळतात. त्यामुळे माध्यमांना भरपूर बातम्या मिळतात. टेलिव्हिजनच्या वाहिन्या अशा बातम्या देऊन लोकांची चांगलीच करमणूक करीत असतात. माहितीच्या अधिकारामुळे आणि संवेदनशील बातम्यांमधून मोठ्या धंद्यांचे मालक वा चालक, सत्तेतील राजकारणी आणि सनदी अधिकारी यांच्या दुराचारी संबंधातील रोज नवीन आर्थिक भानगडी बाहेर येत आहेत. भ्रष्टाचार आता या देशाच्या मुळापर्यंत जाऊन पोहोचलाय पण ८०च्या दशकातही तो होता. देवधरांनी तो प्रत्यक्ष अनुभवला आणि त्याचे उदाहरण वर दिलेच आहे. देवधरांनी जाणले की दिल्लीत प्रामाणिकपणा, त्याग, सेवा या गुणांना किंमत नव्हती किंवा आदरही नव्हता आणि आजही नाही. सर्वत्र स्वार्थ हाच स्थाहीभाव!

**भारतीय टेलीव्हिजनचे खाजगीकरण**

जानेवारी १९९० साली राजीव गांधींचे सरकार निवडणूक हरल्यानंतर देवधर दिल्लीला राम राम ठोकून मुंबईत परत आले. अचानक १९९२ साली पंतप्रधान नरसिंहरावांचा देवधरांना दिल्लीहून फोन आला. त्यांनी देवधरांना टेलिव्हिजनचे खाजगीकरण करण्यासाठी नेमलेल्या समितीचे अध्यक्षपद घेण्याची सूचना केली. सुप्रसिद्ध पत्रकार निखिल चौधरी, मृणाल पांडे, नाटककार हबीब तन्वी आणि कपिला वात्सायन त्या कमिटीचे इतर सदस्य होते. खाजगीकरणाची पद्धत आणि नियम निश्चित करण्याचे काम या समितीने आठ महिन्यात पूर्ण केले. त्यानुसार १९९२च्या अखेरीस मेट्रो वाहिन्यांची सुरवात झाली.

मात्र देवधर आज म्हणतात, “हेची फल काय मम तपाला!” ते पुढे म्हणतात, “लहान मुलांच्या मनावर प्रभाव टाकणाऱ्यांमध्ये टेलिव्हिजन आघाडीवर आहे ही गोष्ट आता जगात मान्य झालेली आहे. जगात या विषयावर झालेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, टेलिव्हिजन पहाण्याने मुलांची संस्कृतीच बदलते. मुलांना शाळेत शिकवल्या जाणाऱ्या कविता आणि गाण्यापेक्षा टेलिव्हिजनवरच्या जाहिरातींची जिंगल्स अधिक पाठ असतात आणि सध्या ३ -४ वर्षांची मुले टीव्हीवरील छोटा भीम, कृष्ण आणि स्पायडर मॅनमुळे तर वेडीच झाली आहेत. अमेरिकेत १३ ते १९ या वयोगटातील मुले रोज चार तास टिव्ही पहातात. भारतात यापेक्षा वेगळे चित्र नाही, असलेच तर ते त्यापेक्षा अधिक वेळच पहात असणार. भारतात मुलांसाठी २००५ साली जवळ जवळ शंभर वाहिन्या उपलब्ध होत्या आणि त्या थेट त्यांच्या झोपण्याच्या खोलीत जाऊन पोहोचल्या होत्या. आज पाचशेच्यावर वाहिन्या आहेत! त्यांच्या पालकांना ही मोठी चिंतेची बाब वाटते. काही लोक याबाबत तक्रार करून थकले. काहीजण माध्यम स्वातंत्र्याचा धोशा लावत असतात. पण माध्यमांवर बंधन आणण्यासाठी समाजाच्या हातात सध्या तरी काही शस्त्र दिसत नाही. ज्या अमेरिकेचा आदर्श आपण गिरवतो तेथे मात्र माध्यमे जे काही पडद्यावर दाखवतात,

त्यासाठी त्यांना जबाबदार धरले जाते. १९९० सालीच अमेरिकेत चिल्ड्रेन टेलिव्हिजन अॅक्ट (सीटीए) अस्तित्वात आला आहे. देवधरांना असे वाटते की आपल्या देशातील मुलांच्या भवितव्याचा विचार करुन आपल्याकडेही असे कायदे करण्याचे धाष्टर्य आपल्या सरकारात आले पाहिजे.

**देवधरांची पुस्तके आणि भाषणे**

**“कॅपिटल पनिशमेंट”**




दिल्लीत एकटे असणारे आणि निराश झालेले देवधर कवी बनले! उत्स्फूर्तपणे लिहिलेल्या त्यांच्या इंग्रजी कविता वसंतराव साठ्यांना खूप भावल्या आणि त्या प्रसिद्ध करण्यासाठी त्यांनी देवधरांना गळ तर घातलीच पण एक अनुरूप प्रस्तावनाही लिहिली. “कॅपिटल पनिशमेंट” अशा अनुरूप नावाने प्रसिद्ध झालेला हा कविता संग्रह खूप नावाजला. मराठी आणि गुजराथी भाषेत त्याचे रुपांतरही झाले. अमेरिकेत स्थाईक झालेल्या अनुराधा गानू या लेखिकेने “अजब तुझे सरकार” या नावाने त्याचे सुंदर रुपांतर केले आणि ग्रंथालीने ते प्रकाशित केले.महाराष्ट्र भूषण कवी मंगेश पाडगावकर आणि कै. शांताबाई शेळके यांनी त्यांच्या प्रस्तावनेत देवधरांच्या मूळ कवितांचीही खूप स्तुती केली आहे. गुजराथी रूपांतर वल्लभ विद्यानगरच्या इंजिनिअरिंग कॉलेजातील एका प्राध्यापक सुरेश पारीख यांच्या ‘विचारवेलू’ संस्थेने केले.

**“द थर्ड पेरेन्ट”**




हे देवधरांचे दुसरे गाजलेले पुस्तक. टेलीव्हिजन या इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा राष्ट्र बांधणीसाठी कसा उपयोग होतो आणि भारतासारख्या बहुसंख्य अशिक्षित लोकसंख्येच्या देशात ते कसे वापरता येईल याचे अभ्यासपूर्ण विवेचन देवधरांनी यात केले आहे. अमेरिकेत झालेल्या सामाजिक अभ्यासात लहान मुलांच्या मनावर आई आणि वडलांच्या नंतर संस्कार करणाऱ्यांमध्ये टेलीव्हिजन तिसऱ्या क्रमांकावर आहे असे देवधरांनी वाचले आणि तेच अनुरूप नाव त्यांनी आपल्या इलेक्ट्रॉनिक माध्यमावरील पुस्तकास दिले. १९९१ साली दिल्लीतल्या विकास पब्लिशिंग कंपनीने ते प्रकाशित केले. २००७ साली त्यात भर घालून त्याची चौथी आवृत्ती देवधरांनी प्रसिद्ध केली.

देवधर लिहितात, “३३ लाख चौरस किलोमीटर क्षेत्रफाळावर पसरलेल्या आपल्या ६५ कोटी ग्रामीण जनतेला रेडिओ व टेलिव्हिजन ही माध्यमे मिळाली, पण त्यातर्फे होणारे संदेशवहन हे एकतर्फी

असल्याने ते सरकारी प्रचार माध्यम होण्याची शक्यता अधिक. त्यामुळे ही माध्यमे लोकांच्या हाती असावीत."

देवधर पुढे लिहितात, "गेली ३० वर्षे भारतात टेलिव्हिजन आहे आणि त्याहीपेक्षा अधिक काळ रेडिओ आहे, तरीही त्याचे समाजावर सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय दृष्टया काय परिणाम झाले याचा अभ्यास करण्याचे मुलभूत काम सरकारने आजही केलेले नाही."

**"इज एनीवन आऊट देअर"**

देवधरांचे विविध विषयांवरचे लेख आणि त्यांच्या १९७५ ते २००० या काळात गाजलेल्या भाषणांचा हा संग्रह मुंबईच्या टेक पब्लिकेशनने २००१ साली प्रसिध्द केला. बऱ्याच लोकांच्या संग्रही तो आहे.




**सिनास्थान टुडे - व्हूइंग चायना फ्रॉम इंडिया**

देवधर २००३ पासून दिल्लीतील इंडिया चायना इकनॉमिक्स अँड कल्चरल कौन्सिलचे अध्यक्ष आहेत. त्यांचा चीनशी १९८३ पासून संपर्क आहे. त्यावेळी ते चीनला इलेक्ट्रॉनिक उपकरणे विकत असत. त्यासाठी त्यांनी चीनला भेटी दिल्या आणि चीनविषयी, विशेषतः चीनी समाजाविषयी त्यांची जिज्ञासा वाढली. रविंद्रनाथ टागोरांच्या चीन विषयीच्या लेखांनी त्यात वाढ झाली. १९८८ साली राजीव गांधीच्या चीनच्या भेटीपूर्वी चीनमध्ये जोराने सुरु झालेल्या उद्योग क्षेत्रातील भरधाव प्रगतीचा अभ्यास करणे जरूर होते. १९९१ साली दिल्ली सोडल्यावर पुढील दहा वर्षात त्यांच्या तीनचार वाऱ्या झाल्या. २००३ नन्तर आज पर्यंत ते ४२ वेळा चीनमध्ये अनेक शहरी आणि ग्रामीण भागात हिंडले. २००८ साली छोट्या आणि मध्यम उद्योगधंद्यामध्ये झालेल्या विस्मयकारक प्रगतीचा अभ्यास करून त्याचा एक सविस्तर शोधनिबंध सरकारला दिला. भारत आणि चीन हे एकत्र आल्यास आशिया खंड जगातील सर्वात महत्वाचा बनू शकेल या विचाराने दोन्ही देशातील सामान्य नागरिकांमध्ये जवळचे संबंध निर्माण करणे यासाठी ते प्रयत्नशील आहेत. भारतीय लोकांमध्ये चीन विषयी भीती आणि



गैरसमज आहेत आणि ते दूर करण्यासाठी त्यांनी तीन वर्षे सखोल अभ्यास करून चीनवर हे सविस्तर पुस्तक ‘मॅक्ग्रो हिल’ या जगप्रसिद्ध प्रकाशनासाठी लिहिले. भारतामध्ये दोन हजार वर्षापूर्वी चंद्रगुप्त मौर्याच्या काळात आपण भारतीय चीनला ‘सिनास्थान’ म्हणत असू असा इतिहास आहे. तो सिनास्थान आज कसा आहे हे देवधरांनी या पुस्तकात सविस्तर सांगितले आहे. अनेक तज्ञांनी नावाजलेले हे पुस्तक डिसेम्बर २०१२ मध्ये प्रकाशित झाले.

**देवधरांच्या प्रसिद्ध भाषणांचा सारांश**

**विक्रम साराभाई स्मृती व्याख्यान**

देवधरांना नोव्हेंबर १९८७ मध्ये “विक्रम साराभाई स्मृती व्याख्यान” देण्यासाठी अहमदाबाद येथे निमंत्रित केले होते. त्या प्रसंगी देवधर म्हणाले, “डॉ. होमी भाभा आणि डॉ विक्रम साराभाई या भारतातील सर्वात दोन व्यक्ती महत्वाच्या आणि अभिमान वाटावा अशा विज्ञाननिष्ट प्रकल्पाच्या शिल्पकार आहेत. पंडित नेहरूंनी डॉ. होमी भाभा यांना खास अधिकार देऊन अणुशक्ती संशोधन संस्था स्थापन करायला सांगितले आणि डॉक्टर भाभांनी अभिमान वाटावा अशी संस्था उभारून देशाला आंतरराष्ट्रीय मान मिळवून दिला. पंडितजींची कन्या पंतप्रधान इंदिरा गांधीनीही डॉ विक्रम साराभाई यांच्या हाती अवकाशात झेप घेण्यासाठी सार्वभौम सत्ता दिली. साराभाई यांनी त्याचे सोने केले. अणू आणि अवकाश क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीमुळे प्रगत राष्ट्रात भारताला एक मानाचे स्थान मिळाले. दोघेही अव्वल दर्जाचे शास्त्रज्ञ तर होतेच पण त्याहीपेक्षा दोघेही अचूक दिशा जाणणारे दूरदर्शी नेते होते. माणसे जोडण्याची आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना आवाहन करून प्रगती साधण्याची कला त्यांच्यात होती. वागणूकीतील आपलेपणा, दुसऱ्यांबध्दलची जाण, बोलण्यातला सच्चेपणा, सत्याची कास आणि लोकांना त्यांच्या कोशातून बाहेर काढून देशाच्या कामाला लावण्याचे कसब दोघांच्यातही होते. खरेतर शास्त्रज्ञांना एकत्र आणून एकजुटीने आणि एका दिशेने नेणे फार सोपे नाही. आज इथे बसलेले शास्त्रज्ञ हे जाणतात. संस्था बांधणे आणि ती इतक्या उंचावर नेऊन ठेवणे हे सामान्य व्यक्तीचे काम नव्हे. त्यांना सलाम करून मी माझे विचार आपल्यापुढे संपवतो. “



आय.आय.टी. कानपूर
कॉनव्होकेशन सभारंभ (१९८८)

विज्ञानातील प्रगतीचा वेग आज पूर्वी केंव्हाही नव्हता इतका प्रचंड आहे. त्याचा परिणामही समाजावर मोठ्या प्रमाणात दिसत आहे. नवीन बदल सामावून घेणे समाजाला अधिकाधिक कठीण होत जाणार आहे. पण मला वाटते की योग्य दिशा दिली इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्यूनिकेशनच्या द्वारा शहरी आणि ग्रामीण भागात असलेली दरी संपवता येणार आहे. त्यामुळे ग्रामीण जनतेचे शहराकडे होणारे स्थलांतर थांबवता येणे शक्य आहे. ग्रंथात अडकून

राहिलेले ज्ञान दूरदर्शनसारख्या दृकश्राव्य माध्यमाद्वारे ग्रामीण आणि अशिक्षित लोकांपर्यंत सहजी नेणे शक्य होणार आहे. दूरदर्शन वापरुन गुणवत्तापूर्ण शिक्षण अगदी म्युनिसिपालिटीच्या शाळांपर्यंत नेता येईल. टीव्ही हे संदेशवहनाचे एकतर्फी साधन आहे तर टेलिफोन हे दुतर्फी माध्यम आहे. टेलेक्स-फॅक्स एका ठिकाणची माहिती-नकाशे, चित्रे, महत्वाची कागदपत्रे क्षणार्धात दुसरीकडे नेऊन पोहोचवते. या संदेशवहनाचा खर्च दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. फायबर ऑप्टिक्समुळे संदेशवहनाचा वेग वाढून किमती कमी होतील. जगातल्या जुन्या संस्कृती नदीच्या कडेने वसल्या. आता रस्ते व रेल्वे आली की विकास होतो, तसे संदेशवहन हे विकासाचे नवे परिमाण आहे. संदेशवहनामुळे हा लांब-रुंद पसरलेला भारतदेश जवळ येणार आहे. टेलिफोन, फॅक्स यामुळे लोकांची ही सर्व यातायात अधिक सुलभ होते आहे. यामुळे शहरातील प्रवासही कमी होईल. आता लवकरच प्रत्येकाला संगणकावर आधारित रेल्वेतील जागांचे आरक्षण स्वतःच करता येईल आणि त्याला जोडून असलेला काळाबाजारही नाहीसा होईल. दूरदर्शनमुळे सर्व समाज एकसंध होऊ शकतो. एकच माहिती एकाच वेळी सर्वांपर्यंत पोहोचवता येते.

**प्रो. एस.के. मित्रा स्मृती व्याख्यान, कलकत्ता**

एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीपासून १९५० पर्यंतच्या दीडशे वर्षात इंजिनिअर मंडळींनी मनुष्य जीवन सुसह्य करणारे अनेक नेत्रदीपक बदल घडवून आणले. घराघरात नळाने पाणी पोचवले, विजेचे दिवे लावून रात्रीचा दिवस केला, रस्त्यांचे जाळे निर्माण करून प्रवास सुखकर केला, मोटारी, रेल्वे आणि विमानानद्वारा तो जलद केला. हाताचे कष्ट कमी करणारी स्वयंचालित यंत्रे समाजाला दिली, कापड विणण्याच्या गिरण्या सुरु झाल्या, शिवणयंत्रे निर्माण केली. आम्हा इंजिनिअर मंडळींना समाजात महत्वाचे स्थान मिळाले. इतरेजनांकडून आदर मिळू लागला. पण अलीकडच्या तीनचार दशकात आपल्या घोडदौडीला लगाम घालण्याची जाणीव विचारवंतांना वाटू लागली आहे. आपल्या उत्साहात आपण वातावरणावर अनिष्ट परिणाम करीत आहोत हे आपण विसरलो. धरणीमातेची निसर्ग संपत्ती अविचारीपणे वापरून आपण जगावर एक नवे भयंकर संकट ओढवत आहोत याची जाणीव प्रकर्षाने आता आम्हाला झाली आहे. पुढील पिढ्यांना आपल्या चुकांचा त्रास होणार नाही अशा नवीन तंत्रज्ञानावर आधारित उपयुक्त अशी उपकरणे आपण निर्माण केली पाहिजेत. हे नवीन आव्हान आम्हा लोकांपुढे आहे. आपल्या कामाबद्दल, विशेषतः सरकारी नोकरी करणाऱ्या अभियंत्यांच्या कामाबद्दल, अलीकडे आणखी एक गोष्ट, मला खटकते. सार्वजनिक अभियांत्रिकी कामांचा आमचा दर्जा सतत खालावत आहे. कामाची गुणवत्ता दिवसेंदिवस कमी होत असून समाजातील आपल्याबद्दलचा आदर कमी होत आहे. त्यामुळे समाज आपल्यावर नाराज आहे. त्यात सुधारणा करणे आपल्याच हातात आहे. कंत्राटदारांवर कडक नजर ठेऊन हे साधू शकेल. यातून आपल्याला खाजगी मिळकत मिळत असते असा प्रवाद आहे पण ते काहीही असले तरी त्याचा परिणाम कामाच्या गुणवत्तेवर होणार नाही हे कसोशीने जपले पाहिजे.

प्रत्येक पीएचडीधारक हा जसा शास्त्रज्ञ नसतो तसा इंजिनिअरिंगचा प्रत्येक पदवीधारक हा इंजिनिअर नसतो. नुसत्या पदव्या मिळवून कोणी इंजिनिअर होत नाही. त्यासाठी हस्तनैपुण्य हवे, शोधक नजर हवी आणि अधिक चांगले घडवून आणण्यासाठी बदल करता आला पाहिजे. मी असे

कार्य निपुण इंजिनिअर्स पाहिले आहेत की त्यांना इंजिनिअरिंगचे शिक्षणहि घेता आले नव्हते. उत्तम इंजिनिअर किंवा शास्त्रज्ञ बनण्यासाठी तुमच्या मनाचा कल तिकडे असला पाहिजे. ती तुमची जीवनप्रवृत्ती असायला हवी. डार्विन काय की आइनस्टाइन,शाळेत ते यथातथाच विद्यार्थी होते पण एकाने जीवशास्त्रात तर दुसऱ्याने भौतिकीत क्रांती घडवून आणली. इंजिनिअरचे कुतूहल आयुष्यभर जागे हवे, त्याने सतत शिकले पाहिजे आणि जोखीम घ्यायची त्याची तयारी सतत असली पाहिजे. समस्यांची उत्तरे त्यांना सतत शोधता आली पाहिजेत. त्यांची विचारधारणा नेहमी चौफेर पाहणारी हवी.

**इतर ठळक व्याख्याने**

१९९२ - आय. आय. टी. कानपूरमध्ये दीक्षांत व्याख्यान

१९९६ - जागतिक मराठी परिषदेच्या जेरुसलेम, इस्रायलमध्ये अध्यक्षीय व्याख्यान

१९९७ - महाराष्ट्र इकनॉमिक डेव्हलेपमेंट कौन्सिलमध्ये अध्यक्षीय व्याख्यान

१९९९ - मराठी विज्ञान परिषदच्या नागपूर अधिवेशनात अध्यक्षीय व्याख्यान

**संदर्भ -**


1. कॅपिटल पनिशमेंट - श्री.प्रभाकर देवधर
2. इज एनीवन आउट देअर - लेखक - श्री.प्रभाकर देवधर
3. देवधरांचे इतर विषयांवरील अनेक लेख
4. सिनास्थान टुडे-ह्युइंग चायना फ्रॉम इंडिया - लेखक - श्री.प्रभाकर देवधर
5. देवधरांशी गेली १३ वर्षे असंख्यवेळा झालेली चर्चा



अ. पां. देशपांडे,

बी-5,जलाराम ज्योत,वल्लभबाग लेन,
घाटकोपर (पूर्व),मुंबई 400 077
फोन 9322247074
इ-मेल - apd1942@gmail.com


मुंबई

२०१५